
श्रीमत् रामानंदस्वामी, दाभोली मठ



# कुडाळदेशकर गौडब्राह्मणांचा संक्षिप्त इतिहास

— गुं. फ. आजगांवकर

# सामंत राजवंशाचा संक्षिप्त इतिहास



**गुं. फ. आजगांवकर**

इतिहाससंशोधक राजवाड्यांचे मतें बुद्धपूर्व व बुद्धोत्तर क्रांतीनंतर राष्ट्रीक, वैराष्ट्रीक व महाराष्ट्रीक क्षत्रियांबरोबर राजपुरोहित म्हणून व अन्य नात्यांनी यजुर्वेदी ब्राह्मण दक्षिणापर्थात आले. संबंध हिंदुस्थानांत यजुर्वेदी ब्राह्मण पुष्कळ आहेत. कारण यजुर्वेदाचा विस्तार मोठा, ह्याच्या शाखा पुष्कळ आणि कर्माशीं संबंध असल्यामुळें त्यांचा विस्तारहि अधिक आहे. सर्व गौड–ब्राह्मण यजुर्वेदी आहेत. पंचगौडांतील आद्य गौड उर्फ कुडाळदेशकर हे ब्राह्मण मूळचे यजुर्वेदी असून दक्षिणेंत येऊन ऋग्वेदी झाले आहेत.

शके ४२६ मधील पंच सिद्धांतिका ग्रंथामध्यें कोंकण शब्द आला आहे. शालिवाहन शकाच्या ९४६ व्या वर्षातील जयसिंह चालुक्याच्या एका ताम्रलेखांत ‘सप्त कोंकण’ असा शब्द आला आहे. काश्मीरसारख्या अतिदूर देशाच्या इतिहासांत सप्तकोंकण हा शब्द आढळतो. कोंकणचे हे सात विभाग कोणते याबद्दल निश्चित मत नाहीं. रा. भागवतांच्या मते ते पुढीलप्रमाणें आहेत—( १ ) लाट ( २ ) सोपार ( ३ ) कुडाळ ( ४ ) गोमंत, गोकर्ण किंवा कोंकण ( ५ ) तुळव ( ६ ) केरळ ( ७ ) मलय.

कुडाळ हा सप्तकोंकणाचा एक भाग याबद्दल वाद नाहीं.

" Brahmin-means, one who knows Brahma or Vedas Therefore Gauda Brahmin means a religious protector Brahmin. The duty of Gauda Brahmin was to save the religion and the country. Gauda Brahmins were well versed in the Vedic Sastras as well as the art of Chivalry."

—A short History of Gauda Brahmins of India,

" गौड " हा शब्द मूळ गुड्–रक्ष्–रक्षण करणें या धातूपासून बनलेला आहे. म्हणून 'गौड' या शब्दाचा अर्थ वांचविणारा किंवा लढणारा असा होतो आणि 'ब्राह्मण' म्हणजे ब्रह्म किंवा वेदशास्त्र जाणणारा. म्हणून 'गौड ब्राह्मण' या जोडशब्दाचा अर्थ धर्माचें रक्षण करणारा, देशाचें रक्षण करणारा असा होतो आणि म्हणूनच गौड ब्राह्मणांची वैदिक शास्त्रांत व क्षात्रवृत्तींत सारखीच प्रसिद्धी आहे.

## कुडाळदेशकरांची आद्य वसाहत

इसवी सनापूर्वी गौड उत्तरेंतून आल्यावर कुडाळ व गोवें या भागांतील ज्या गावांत प्रथमतः वसाहत करून राहिले त्या गावांस त्यांचे **'मूळ भुंकेचे'** गांव म्हणतात. वरील कालानंतर जे गांव यांनीं मागाहून वसविले त्या गांवांत यांचे **'जोड भुंकेचे'** गांव असे म्हणतात. कुडाळदेशकरांचे मूळ भुंकेचे गांव चौदा असून जोड भुंकेचे चार आहेत. कुडाळदेशकरांचे हे मूळ भुंकेचे व जोड भुंकेचे गांव फक्त कुडाळ प्रांतांतच आढळतात. या गांवास देशसत्तेचे गांव असेंही म्हणतात. कुडाळ देशाची राजसत्ता प्राचीनकाळीं या गांवांतील कुडाळदेशकरांच्या हातीं होती. हे मूळ भुंकेचे गांव असे आहेत— १ वालावल २ धामापूर ३ नेरूर ४ पाट ५ परुळें ६ म्हापण ७ खानोली ८ आजगांव ९ गोळवण १० केळूस ११ वेतोरें १२ दाभोली १३ तेंडोली आणि १४ तिरवडें! यांत जोडभुंकेचे गांव मिळविले कीं झालें. ते असे आहेत—१ कोचरें २ मसदें ३ चेंदवण ४ माळगांव.

इ. स. ६ व्या शतकांत कुडाळ प्रांतांत पूर्वकालीन चालुक्यांची सार्वभोम सत्ता असल्याचें दिसून येतें. चालुक्य वंशांत सत्याश्रम पुलकेशीचा ज्येष्ठ पुत्र चंद्रादित्य यानें इ. स. ७ व्या शतकांत 'कुडवल पत्तन' किंवा कुडाळ हें राजधानीचें मुख्य शहर केलें होतें. या चंद्रादित्याच्या विजयभट्टारिका राणीनें, वेंगुर्ल्याच्या उत्तरेस असलेल्या कोंचरें गांवांतील 'बकुलकच्छ' नांवाचें शेत खाजणासहित एका ब्राह्मणास दान केल्याचा ताम्रपट आहे. शिवाय हिनें भूमिदान दिल्याचे दुसरे दोन ताम्रपट नेरूर गांवीं सांपडले आहेत.

वरील काळांत कुडाळदेशकर हे लेखणी व तरवार यांचे अधिकारी असल्यामुळे राज्यांत त्यांचेंच प्राबल्य जास्त होतें. चंद्रादित्यानंतर त्याच्या राणीनें कांहीं वर्षे राज्य केलें.

तिच्यानंतर मात्र चालुक्यांनीं कुडाळांत राज्य केलें नाहीं. यानंतर कुडाळदेशाचें राज्य कुडाळदेशकरांच्या हातीं आलें. या ज्ञातीचे 'मूळ भूमिकेचे' गांव सांगितले आहेत ते आतां त्यांचे 'देश सत्तेचे' गांव झाले व या देशांचें राज्य या देशसत्तेच्या गांवांतील कुडाळ-देशकरांकडे गेलें. या देशसत्तेच्या गांवांत वालावली, पाट, परुळें, नेरूर व धामापूर हे पांच गांव मुख्यसत्तेचे मानिले जात, व तेथील अधिकाऱ्यास प्रभु, सामंत व नायक अशी प्रमुख सत्तादर्शक नांवें होतीं. देशसत्तेच्या इतर गांवांतील अधिकाऱ्यास 'मतकरी' व 'महाजन' म्हणत. याप्रमाणें **सामंत, प्रभु, नायक, मतकरी, महाजन** या नांवांच्या एकूण अठरा अधिकाऱ्यांचें हें कुडाळदेशकरांचें **प्राचीन राजमंडळ** बनलें होतें. या राज-मंडळांत इ. स. १२ व्या शतकापर्यंत केव्हां सामंत, केव्हां प्रभु व केव्हां नायक असे गादीचे मालक असत. इ. स. १३ व्या शतकापासून इ. स. १६९६ पर्यंत वालावलीचे प्रभु सरदेसाई देशमुख होते. प्राचीन काळीं देमसामंत भूपाळ, राजे गोमजी, सूर्यभान चंद्रभान वगैरे कुडाळ-देशकर राजांचीं नांवें त्या प्रांतीं सर्वांच्या तोंडीं असत. 'गोमजीची दिवाळी' हा सण अद्यापिही त्या प्रांतीं पाळतात. इ. स. ६ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत कुडाळदेशकर आपल्या स्वतःच्या दौलतींत फार नावाजलेले होते.

परान्त आणि अपरान्त या कोंकणच्या प्राचीन भागांपैकीं अपरान्तच्या एका भागाला 'कुड्डापरान्त' म्हणत 'कुड्ड' हा शब्द कुडाळ या शब्दांतील 'कुड्' या शब्दांशीं अत्यंत सदृश दिसत असल्यामुळें कुड्डापरान्त हें दक्षिण कोंकणांतल्या कुडाळचेंच प्राचीन नांव ठरतें. १२ व्या शतकांत कुडाळचें 'कडुवलपत्तन' असें नांव असल्याचें देमराजाच्या ताम्रपटा-वरून दिसतें. प्रसिद्ध मुसलमान लेखक (१५८०–१६२६) फेरिस्ता कुडाळचा उल्लेख 'कुंडवाल' असा करतो. भूषण कवीनें लिहिलेल्या 'शिवराजभूषण' काव्यांत शिवाजीनें खवासखानाबरोबर कुडाळ येथें केलेल्या लढाईचें वर्णन आलें आहे.

प्राचीन काळीं कुडाळ देशास पंचमहाल कुडाळ असेंही म्हणत. कुडाळ देशांत **मणेरी, फोंडें, सांखळी, डिचोली** व **पेडणें** असे पांच महाल; एक विलायत–बांदें, बारा तर्फा–आजगांव, सांतर्डे, तळवडें पाट, मनोहर, माणगांव, हवेली, कळसुली, बोर्डवें, बराड, मालंड व मसुरें; दोन कर्याति–नारूर व पाटगांव आणि एक बंदर–वेंगुर्लें, इतका प्रदेश येतो. एका काळीं या देशाची उत्तरेची हद्द दाभोळपर्यंत होती. राज्यक्रांतीमुळें देश हें नांव सांप्रत नाहीसें होऊन या देशाच्या मर्यादित भागांस सिंधुदुर्ग नांवानें संबोधिलें जातें. कुडाळ देश हें प्राचीन नांव सध्यां फक्त कुडाळदेशकर या नांवांतच दिसतें.

कुडाळ प्रांताच्या पूर्व सरहद्दीवर सह्याद्रीची ओळ आहे. तिच्या शिखरावर अनेक किल्ले बांधिले होते. त्यांतील मनोहरगड हा विशेष प्रसिद्ध आहे. त्याच्या नजीक मनसंतोष नांवाचा एक लहानसा किल्ला आहे. शिवाय फुकेरी येथें हनुमंतगड, आंबोली येथें महादेव-गड, सोनवडें येथें नरसिंहगड किंवा सोनगड, रेडी येथें गणनगड असे किल्ले होते. परंतु कांहीं अगदीं मोडून गेलेले, तर कांहीं साफ जमीनदोस्त झालेले आहेत.

कुडाळप्रांतांत देव व देवळें पुष्कळ आहेत. प्रत्येक गांवांत देवतांचीं निदान बारा तरी स्थळें असतात.

त्या स्थळांचीं नांवें व सांप्रतचा अनुक्रम पुढें दिल्याप्रमाणें आहे :—

( १ ) पूर्वसत्ता ( २ ) राजसत्ता ( ३ ) गावडा ( ४ ) गांगो ( ५ ) खातया ( ६ ) मडवळ ( ७ ) जैन ( ८ ) बामण ( ९ ) कुळ ( १० ) भराडी ( ११ ) बेळामहार ( १२ ) पानमहार. या सर्व स्थळांचे अधिकारी निरनिराळे असून प्रत्येक स्थळांत त्या त्या अधिकाऱ्याचा वँस म्हणजे वंश म्हणून एक दगड पूजिलेला असतो. पूर्वसत्तेच्या स्थळांत दगडाऐवजीं हात जोडून उभी असलेली मूर्ति असते. राजसत्तेच्या अधिकाऱ्यास 'गांवकर' म्हणतात व इतर स्थळांच्या अधिकाऱ्यास 'विरतीक' म्हणतात. कुडाळप्रांतांतील देवस्थान व्यवस्थेंत ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत सर्व हिंदूंस अधिकार दिलेला आहे. त्यावरून ही व्यवस्था लावून देणाऱ्या राजसत्ताधाऱ्यांच्या सहिष्णुतेची कल्पना होते. कुडाळप्रांतांत मध्यंतरींच्या काळांत राज्यक्रांत्या झाल्या तरी त्यामुळें देवस्थानव्यवस्थेंत फारसा फरक पडलेला नाहीं.

कुडाळ देशांत कुडाळदेशकरांचे देशसत्तेचे म्हणून जे अठरा गांव सांगितले त्या गांवांत हे देशसत्तेचे अधिकारी आपल्या देशांतील राजभार वसूल करून मानपान घेत. कुडाळदेशकरांच्या देशसत्तेचे गांवांत **वालावली, नेरूर, धामापूर, पाट व परुळें** असे पांच प्रमुख सत्तेचे गांव होते. या पांच गांवांत कुडाळदेशकरांनीं आपल्या उपास्यदेवता स्थापन केल्या. मध्यभागीं वालावल येथें श्रीनारायणाची मूर्ति पंढरीच्या विठोबाच्या मूर्तिसारखीच वाळूची आहे.

हें श्रीनारायणाचें देवालय कुडाळदेशकर देसाई घराण्यांतील सूर्यभान व चंद्रभान यांनीं वाढविलें. त्या देवस्थानाच्या खर्चाकरितां गांवाच्या उत्पन्नांपैकीं सुमारें अर्ध्या उत्पन्नाच्या सनदा व खर्चाचें व्यवस्थापत्रक तयार करून दिलें. **पाट, धामापूर व नेरूर** येथें अनुक्रमें **गणपती, कनकादित्य** किंवा **आदिनाथ, देवी भगवती** व **शीव ( कलेश्वर )** यांचीं देवळें आहेत. शिवाय नेरूर येथें **श्रीब्रह्मदेवाचें देवालय** आहे. पुष्कर क्षेत्रांवाचून दुसऱ्या कोठेंही ब्रह्मदेवाचें देवालय नाहीं.

या पांच प्रमुख गांवांपैकीं वालावली, नेरूर व पाट येथील अधिकाऱ्यांस ( प्रभु ) आणि **परुळें धामापूर** येथील अधिकाऱ्यांस **सामंत** व **नायक** असें म्हणत. बाकी राहिलेल्या तेरा गांवांतील अधिकाऱ्यांस **मतकरी** व **महाजन** असें म्हणत. हे सर्व अधिकारी मिळून कुडाळदेशाचें प्राचीन राजमंडळ बनलें होतें.

—×०×—





# श्री नाग सामंत यांचा शिक्का व मोर्तब

श्री नागसामंत यांच्या शिक्यांतील अशुद्धता काढून टाकल्यास शिक्यांतील शब्द असे होतात :—

**सामंत कुले शोभानु-**
**मांगलाख्य महेश्वरः ।**
**श्री नाग सामंत मुद्रेयं**
**जनभृत्यं विराजते ॥**

अर्थ :—सामंत कुलाची कीर्ति अत्यंत विशुद्ध व तेजस्वी करून ती दिगंतीं पोंचविणारा **मांगला** किंवा **मांगल** नांवाचा **महाराजा** (दुसऱ्या अर्थी शंकर) (त्या वंशांत झालेला) श्रीनाग सामंत याची ही मुद्रा प्रजेच्या कल्याणासाठीं विराजमान होत आहे.

इसवी सनाच्या आरंभापूर्वीपासून कुडाळदेशकर ब्राह्मणाची वस्ती कुडाळ देशांत आहे. चालुक्यांच्या ताम्रपटांत या ज्ञातीच्या ब्राह्मणांचे उल्लेख आहेत. कुडाळदेशकर ब्राह्मण हे या कालीं शेतीवर उपजीविका करून राहात आणि वेदाध्ययन व यज्ञयाग यांत ते आपलें जीवन व्यतीत करीत. या ब्राह्मणांत मांसाहार करण्याची वहिवाट नव्हती व आजही कांहीं विशिष्ट मर्यादा संभाळून कांहीं कुलें मांसाहार करतांना आढळतात. कुडाळदेशकरांनीं ह्या भागांत आपल्या उपास्य देवतांची स्थापना केलेली दिसते. १२ व्या शतकांत कुडाळ

भागांत जैन धर्माचें प्राबल्य वाढत होतें; परंतु कुडाळदेशकरांनीं त्याला वेळींच आळा घातला. त्यांनीं ब्राह्मणी धर्मास अग्रमान दिला, ही गोष्ट खरी असली तरी इतर धर्माचाहि त्यांनीं समन्वय केला ही गोष्ट विसरतां कामा नये. गांव देवस्कींत जी बारा स्थळें आहेत, त्यांपैकीं एक जैनांस दिलें आहे. अंत्यजांच्या देवांबद्दलहि त्यांस आदर होता. गांवदेवस्कीत महारास शेवटचें पण मानाचें स्थान दिलें आहे. पुढें भागवत धर्माचें महत्त्व वाढलें व वैदिक धर्म मागें पडूं लागला तेव्हां कुडाळदेशकरांनी सोनवडें येथें एक धर्मपीठ स्थापून वैदिक धर्मास उत्तेजन दिलें. कुडाळदेशकरांच्या हातांत शेंकडों वर्षें राजसत्ता होती. गोव्यांतील धर्मसमीक्षणाच्या अंमलांत तिकडील जे हिंदु इकडे परागंदा होऊन आले त्यांना सर्व प्रकारचें सहाय्य कुडाळदेशकरांनीं दिलें होतें. कुडाळदेशकरांच्या राज्यांत वजनें व मापें अगदीं स्वतंत्र होतीं. कुडाळी माप कालपरवांपर्यंत अस्तित्वांत होतें.


जमिनीच्या उत्पन्नाचा राजभाग घेण्याची 'कुंवळें' या नांवाची स्वतंत्र पद्धति होती. अशा कुडाळदेशकरांचा प्राचीन इतिहास इसवीसनाच्या मागेंपर्यंत संशोधणें शक्य आहे. परंतु आज तरी नागदेवाच्या ताम्रपटामुळें प्रमाणिक होणाऱ्या कुडाळदेशकरांच्या इतिहासावर समाधान मानून राहणें भाग आहे. प्रथम शतकाच्या आरंभीं सामंत कुलाचा कुडाळदेशांतील मूळ पुरुष देवशर्मा उत्तर हिंदुस्थानांतून कुडाळ देशांत जेव्हां आला तेव्हां त्याचा जाहीर सत्कार करणारे त्याचे ज्ञातिबांधव या भागांत निरनिराळ्या अधिकारपदांवर येथें वावरत होते यांत शंका नाहीं. देवशर्म्याच्या आगमनानें त्यांना आनंद वाटणें स्वाभाविक आहे.

## नागसामंताचा ताम्रपट


नागदेवाचा हा ताम्रपट हल्लीं वासुदेव आत्माराम देशप्रभु पेडणें यांच्या संग्रहीं आहे. त्यावरून त्याचे अस्सल फोटो आम्ही येथें दिले आहेत.

—x०x—

पत्रा १ ला




पत्रा २ रा, पोट



पत्रा ३ रा, पाठ



पत्रा ३ रा



## नागदेवाचा ताम्रपट.

( ओळी ) ( पत्रा १ ला )

( १ ) ॐ नम शिवायः । जयत्यादिवराहोसी कल्पांभोद
( २ ) धिपल्वले । यस्य दंष्ट्रांकुराग्रास्था भाति मुक्तेव मेदिनी ॥
( ३ ) श्रीमतोस्य वंशः प्रस्तूयते ॥ जान्हवीतीरसंभूतो वेदवे
( ४ ) दांगपारगः । श्रुताध्ययनसंपन्नसत्यवाणीजितेंद्रियः ।
( ५ ) काश्यपो देवशर्मेति ब्राह्मणो ब्रह्मवित्तमः यजु
( ६ ) षां पारगो दांतः षट्कर्मनिरतो भवत् । तुरुष्कोपप्ल
( ७ ) वात्तत्र कौंकणं समगादयं इंदुलाख्ये ग्रामवरे मट्ट राज्ञा
( ८ ) सभाजितः । राज्यश्रियं तदा लब्ध्वा कुणुकेश्वरवासिनः । चं
( ९ ) द्रमौलेर्भगवतप्रसादात्पुत्रवानभौत । तःपुत्रपौत्रा विख्याता शौ
(१०) र्यवीर्यादिभिर्गुणैः । तदन्वये वश्रीमान्जोगदेवः प्रतापवान

( पत्रा २ रा. पोट )

(११) तस्मादभूत्क्रिया दिप्ये देवोजा उगिसंज्ञकः । तस्मादभून्माधि
(१२) देवो रणलक्ष्मीवधूवरः ॥ सौराष्ट्रांन्यदुकुलसंभवां
(१३) श्च लाटानुन्मथ्य प्रवलतरांस्तिलिंगगौडांन् । हंमीरां
(१४) द्रविडपतींश्च पाडिनाथां त्तामुर्व्वी समवतु वीरमा
(१५) धिदेवः कल्पस्थायि विजयतां विजिताशेषपा
(१६) थिवः । यत्कीर्तिसुधया शश्वद्भुवनं धवलायते ।
(१७) यश्चातिवलपराक्रमः कादंबभूपतीनां राज्यं द्वादश
(१८) वर्षं आक्रांतवतो महाराष्ट्रांन्छिमुन्मुल्य विजयादि
(१९) त्यसूनुं श्रीमत्रिभुवनमल राज्यं अभिषिच्य तदनुरा
(२०) गान्सकलं राष्ट्रं पालयति स्मः ॥ संग्रामांगण एक

( पत्रा २ रा. पाठ. )

(२१) एक गुणवान्छेत्तुं रिपुनां शिरः । तीर्थे शांभव ए
(२२) क एव गुणवान्दातुं द्विजेभ्यो धन । धार्मस्यार्जुन ए
(२३) क एव गुणवानाज्ञां विधातुं पितुः श्रीमन्मंगम
(२४) हीपतेः समभवच्छ्रीभैरवो भूपतिः । येन स्ववलमा

(२५) लंव्य हता रिपुपराक्रमाः । समुद्रालंकृता धा
(२६) रा कृपाणधारया भृता । यस्य कृपाणतरणे
(२७) समुल्लासः समुल्लसद् । स्वयोद्धानां भयध्वांतमम्
(२८) मुचन्मुहुर्मुहुः ॥ तस्यांत्यः नागदेवो कांइदेवः सुतो ब
(२९) ली । शिवदीक्षापरो श्रीमान्शिवध्यानपरायणः स च
(३०) पल्लिका नाम ग्रामे समस्तकांसारमहाजनेत्यः तिष्ठन् ॥ स्वस्ति श्री

(पत्रा ३ रा.)

(३१) श्रीभैरवदेराणे । वरडें गीन्हामा । सर्वनमस्य करुनु दी
(३२) धले । श्रीनलसंवत्छरे चैत्रमासे द ३१४ सकु श्रीकाली
(३३) कादेवीवरपुत्र रूपसेटीपुत्र लघुमसेठी दतं ग्राहम
(३४) तांब्रसांसणं प्रदातु पुंर्व दीसे सीमा चीपोलीयेचीः उत्र
(३५) दीसे सीमा चांदेलाचीः दक्षीण दीसे ॐजरीयेची
(३६) सीमाः पसीम दीसे वारघंडीची सीमाः येवं चतुधा
(३७) ट सीमाः दानपालनयोर्म्मध्ये दानाश्रेयोत्पालनं दानं स्वर्गमाप्नो
(३८) ति । पालनादच्युतं पदं । स्वदत्तं परदत्त बा । यो हरेति वसुंधरा । षष्टि वर्ष
(३९) सहस्त्राणि । विष्टांयां जायते क्रिमि । स्वर्णमेकं गवामेकं भूमिरेप्येकमंगुलं
(४०) हरं नरकमाप्नोति । यावदाभूमिसंप्लवं । सामान्योयं धर्मसेतुं नृपाणां काले काले
(४१) काले पालनीयो भवद्भि सर्वानितान् भाविना पार्थिवेंद्रा भूयो भूयो भूयो याचते रामचंद्र

## भाषांतर

ॐ नमः शिवाय । त्या आदिवराहाचा विजय असो, ज्यानें इच्छेप्रमाणें लेखिलेल्या प्रलयकालच्या समुद्रांत आपल्या कोमल आणि अणकुचीदार सुळ्यांच्या टोंकावर धरिलेली पृथ्वी तेथें मौक्तिकाप्रमाणें भासते ॥ वैभवशाली (अशा) त्या (राजा) चा वंश वर्णिला जात आहे । जान्हवीतीरीं जन्मलेला, वेदवेदांगांमध्यें पारंगत, श्रुताध्ययनसंपन्न, सत्यवाणी, जितेंद्रिय, काश्यप गोत्राचा देवशर्मा नामक ब्राह्मण (हा) ब्रह्मज्ञांमध्यें श्रेष्ठ, यजुर्वेदांत पारंगत, आणि षट्कर्मांत गढलेला असा होता । तेथें (जान्हवीतीरावर) तुरुष्क लोकांची स्वारी झाल्यामुळें तो (इतरांस बरोबर घेऊन) कोंकणांत गेला. इंदुल नामक (एका) प्रशस्त गांवांत (तेथील) राजानें त्याचा पुनःपुनः सन्मान केला । नंतर राज्यलक्ष्मी प्राप्त होऊन (त्यास) कुणुकेश्वरस्थ भगवान् शंकराच्या प्रसादानें पुत्र झाले । त्यांचे मुलगे, नानू वगैरे शौर्यवीर्यादि गुणांनीं प्रसिद्धीस आले । त्याच्या वंशांत वैभवशाली

आणि पराक्रमी ‘ जोगदेव ’ झाला । त्याजपासून ( जोगदेवापासून ) वैभवानें दिप त्रिगारा, देवांसारखें सामर्थ्य असणारा ‘ उगी ’ नांवाचा झाला। त्याजपासून मायिदेव झाला, ज्यास रणांत ( विजय ) श्री ( सदैव ) माळ घालीत असे ॥ सौराष्ट्र (काठेवाडांतील राजे ) यदुवंशीय लाट त्याहूनहि प्रबळ तिलिंग गौड हम्मीर, द्रविडदेशचे राजे आणि पाडिनाथ राजे ( मदुरा अथवा उच्चंगीदुर्ग येथील पांड्य संस्थानिक ) यांचा धुव्वा उडवून त्या राज्याचें वीर मायिन्देवानें संरक्षण केलें। कल्पांतापर्यंत ( कीर्तिरूपानें ) राहणाऱ्या, जिंकावयाचा असा एकहि राजा शिल्लक न ठेवणाऱ्या त्याचा विजय असो। ज्याच्या कीर्तिरूप सुधेनें [ हें ] जग कायमचें धवल होऊन राहिलें आहे। आणि जो अमर्याद सामर्थ्यवान् आणि पराक्रमी [ होत्साता ], कदंब वंशीय राजांचें राज्य बारा वर्षेपर्यंत आक्रमण करून बसलेल्या ‘ महाराष्ट्र ’ राजाचें समूळ उच्चाटन करून विजयादित्याचा मुलगा श्रीमत्रिभुवनमल्ल यास राज्यभिषेक करून त्याजवरील प्रेमानें सबंध राष्ट्राचें पालन करिता झाला ॥ समरांगणावर शत्रूंचीं शिरें तोडण्यांत अद्वितीय कुशल। शंकराच्या तीर्थस्थानकावर ब्राह्मणांना द्रव्य देण्यांत अद्वितीय उदार। धर्म[1] राजाची ( आज्ञा जशी ) अर्जुन, ( तशी ) पित्याची आज्ञा पाळण्यांत अद्वितीय गुणवान् ( असा ) श्रीमन्मंगमहीपतीपासून श्रीभैरवभूपति झाला। ज्यानें स्वतःच्या सामर्थ्यावर अवलंबून राहून, शत्रूचे पराक्रम निष्फळ केले। ( आणि ) समुद्रानें सुशोभित झालेला कांठ ( समुद्रकांठ म्हणजे या ठिकाणीं दक्षिण कोंकणपट्टी ) तरवारीच्या धारेनें ताब्यात ठेविली। ज्याची तरवार परजत असतां फांकणारा प्रकाश त्याच्या योध्यांच्या मनांतील नीतीरूपी अंधःकार चोरीत ( नाहीसा करीत ) असे। त्याच्या ( भैरव भूपतीच्या ) लागोपाठ काइंदेवाचा बलवान् मुलगा नागदेव। शंकराचा भक्त, बुद्धिवान्, शंकराच्या ध्यानांत सदा निमग्न असणारा, ( असा होता ॥ व त्यानें पल्लिका ( कांसरपाल ? ) नामक गांवांत समस्त कांसार महाजनांसमोर उभे राहून ॥ ( स्वति श्रीभैरवदे राणे ) वरंडे गांव सर्वसमस्य करून दिलें। श्रीनल संवत्सरे चैत्रमासे शके द ३१४ श्रीं कालिका देवीच्या वरानें झालेला पुत्र ( जो ) रूपसेटी, ( त्याचा ) पुत्र गक्ष्मणसेटी, यास ( दतंग्राहं ? ) ताम्रपट दिला; पूर्वदिशेस चीपोलीयेची सीमा, उत्तरदिशेस चादेलाची सीमा, दक्षिणदिशेस ओंजरीयेची सीमा, पश्चिम दिशेस वारखंडीची सीमा, याप्रमाणे चारी बाजूच्या सीमा ( आहेत ); दान आणि ( त्याचें ) पालन या दोहोंमध्यें दानापेक्षां पालन अधिक कल्याणकारक आहे। दानानें ( त्यास ) स्वर्ग मिळतो। पालनाच्या योगें, अढळ ( सायुज्य ? ) पद ( प्राप्त होते )। स्वतः अगर दुसऱ्यानें दिलेली जमीन जो हिरावून घेतो। ( तो )-साठ हजार वर्षे। विष्टेमध्यें किड्याच्या जन्मास जातो। ( दान दिलेल्यांतून ) एखादें सोन्याचें नाणें, एखादी गाय। एक अंगुळभर देखील जमीन हरण करणाऱ्यास नरक प्राप्त होतो। पृथ्वी बुडेपर्यंत ( कल्पांपर्यंत )। “ हा धर्मरूपी सेतु ( सर्व ) राजांचा एकच आहे. ( तो ) सदासर्वकाळ आपल्या हातून रक्षण केला जावा ” ( असें ) पुढें होणाऱ्या या सर्व राजांना रामचंद्र पुन्हा पुन्हा विनवीत आहे.

या ताम्रपटांत वर्णिलेलें ब्राह्मण राजघराणें नक्की कोणाचें असावें याबद्दल खुद्द जेकब

साहेबांस उलगडा न होऊन त्यांनी त्याबद्दल नुसते एवढेंच म्हणून ठेविलें आहे कीं "तो (ताम्रपट) कांहींसा ऐतिहासिक दृष्ट्या विचारांत घेण्यासारखा आहे या भागांत चालुक्य आणि यादव यांच्या मागोमाग एका बलाढ्य ब्राह्मण घराण्याची राजवट प्रस्थापित झालेली आढळणें, ही एक इतिहासांत नवीनच बाब दिसते."

परंतु सावंतवाडीस बरींच वर्षें चीफ जज्ज असलेले प्रसिद्ध इतिहास-संशोधक मि. जे. ए. सालडाना हे याच्याहि पुढें जाऊन म्हणतातः[१] "बहुधा याच (ताम्रपटांतील) घराण्याचे वंशज, पंधराव्या शतकाचे अखेरीस विजापूरकरांचे मांडलिक असलेले कुडाळचे देसाई हे असावेत."

१. तो संबंध उतारा पुढीलप्रमाणें आहे. "There is also an interesting copper-plate of the year 1436 which proves the existence of a Gaud... Brahmin dynasty of chiefs in Southern Konkan about the beginning of the 15 th century. The founder of this dynasty is said in the coqper plate to have expelled the Marathas who had usurped the power of the Kadambas It is probably to this dynasty the Desais of Kudal balonged, who were tributaries of Bijapur about the close of the 15th century.

"The Kudal Brahmin Desai was taken Captive by Lakham Savant (ancestor of the present Sar Desai of Vadi) and afterwards put to death (about the year 1640 A. D.) and thus ended the Brahmin dynasty.

*(Jour. Anthro Soc. Bom. Vol. VIII)*

## १ आद्यगौडब्राह्मण-जान्हवीतीरसंभूत ब्राह्मण

आद्यगौडांचा मूळ देश म्हणजे प्राचीन श्रावस्तीपुरीजवळील 'गौडा' नगरीवरून नांव प्राप्त झालेला देश होय. आदिगौडदीपिकेमधील पुढील श्लोकांत त्याच्या मर्यादा दिल्या आहेत.

गौडदेशं समारभ्य भुवने शान्तगः शिवे ।
गौडदेशः समाख्यातः सर्वविद्याविशारदः ॥

म्हणजे बंगाल (वंग) पासून अमरनाथपर्यंतचा प्रदेशः पूर्वेस गंगा आणि गंडकी यांचा संगम, दक्षिण आणि पश्चिम दिशांस शरयू, आणि उत्तरेस हिमालय. यांतच जान्हवी-तीर या विशेष नांवाच्या प्रदेशाचा समावेश होतो.

## सामंत राजवंश

बहुतेक सर्व इतिहासकारांनी ताम्रपटाचा काल तेराव्या किंवा चौदाव्या शतकांत नेला असून श्री. वासुदेवराव देशप्रभू शके ११७८ हा आंकडा जमेस धरल्याशिवाय ताम्रपटांतील कदंबाचा उल्लेख मुळींच जुळत नाहीं असें मत व्यक्त करतात. भारत इतिहास संशोधक मंडळाचे चिटणीस श्री. ग. ह. खरे म्हणतात कीं, ताम्रपटांतील पहिला व शेवटचा आंकडा अजून ओळखतां आला नाहीं.

नागसामंताचा वरील उपलब्ध ताम्रपट शके १३५८ चा आहे. असें बहुतेकांनी आपल्या लेखांतून म्हटले आहे. परंतु ताम्रपटाचा शकाचा उल्लेख तपासून पाहिल्यास ती चार अंकी संख्या नव्हे असे दिसते. श्री. नल संवत्सरे चैत्रमासि द३१४ सकु अशी ओळ आहे. पहिला अंक हा अंक नसून गुप्तकालीन द अक्षर ' दशम्याम् तिथौ ' यासाठीं तिथी निदर्शक संक्षेप आहे. दुसरा तीन अंक आणि तिसरा एक अंक सहज लागतो. शेवटचा इंग्रजी आठ प्रमाणे असून तो नागरी चार अंक आहे. एकूण चैत्रमासांतील दशमी ३१४ शक आहे हें स्पष्ट दिसतें. हा कलचुरी संवत असावा. तसे असल्यास ३१४ + २४९ = ५६३ सन पचशें त्रेसष्ट येतो. म्हणजे ताम्रपट सहाव्या शतकांतील मानावा लागतो. नागसामंताचा वर दिलेला शिक्कामात्र सतराव्या शतकापर्यंत कुडाळदेशकर राज्यकर्ते वापरीत होते. सामंतांच्या ऐवजीं पुढील काळांत प्रभुदेसाई सत्तेवर आले तरी मांडलिक किंवा देशमुख व देसाई म्हणून सत्ता त्यांच्याकडे होती हें शिक्क्यांवरून निर्विवाद दिसतें.

## ताम्रपटाची भाषा-शक

ताम्रपट संस्कृतांत आहे. ताम्रपटाचे तीन पत्रे असून पहिल्यावर दहा ओळी, दुसऱ्या पत्र्यावर पोट व पाठ १० + १० = २० ( वीस ) ओळी आणि तिसऱ्या पत्र्यावर आकरा ओळी आहेत. ह्या अकरा ओळींतील पहिल्या सहा ओळी कुडाळी मराठींत असून बाकीच्या संस्कृतांत इतर सर्वसामान्य ताम्रपटांत आढळतात, तशा ठराविक सांच्याच्या आहेत. अखेरच्या तीन ओळी जागा अपुरी झाल्यामुळें अक्षरें लहान व दाटीदाटीनें कोरलेलीं दिसतात. अखेरचा ' रामचंद्र ' हा शुद्ध तर जागेचा अभावीं कसाबसा कोरलेला दिसतो. ह्या वरून अखेरच्या पत्र्यावर मजकूर मावेनासा झाल्यामुळें बऱ्याचशा मजकुराचा संक्षेप करणें लेखकास भाग होण्यासारखी परिस्थिति दिसते. आणि म्हणूनच दानपत्रावरील शक अक्षरीं न देतां अंकीं दिलेला आहे. शि नल संवत्सरे चैत्रमासे XXXX सकु ' अशी काल-निर्णयाची ओळ आहे.

## ताम्रपटाच्या अक्षरांचें वळण

ताम्रपटाची लिपी देवनागरी आहे. २ ऱ्या जयकेशीचा असोगे ताम्रपट, कदंब शास्थादेवाचा ( गोवा ) ताम्रपट, कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांचे संकलित लेख भाग १ ला यांत पृष्ठें ९१ ते ९३ वर देण्यांत आलेला प्राचीन लिपीचा डॉ. बुल्हरचा तक्ता हीं

जिज्ञासूंनी पहावीं. मी डॉ. डेव्हिड डिरिंजनर यांच्या The ALPHABET ह्या बहुमोल ग्रंथाचा उपयोग केला आहे. ह्या ग्रंथकारानें देवनागरीचें बरेंच विवेचन केलें असून पृष्ठ ३५९ वर ( आकृति नं. १६२ ) एक अक्षरांचें वळण दाखविणारा तक्ता जोडला आहे. ताम्रपटांत 'ए' ह्या अक्षरासाठीं त्रिकोण वापरलेला असून चौथा पांचव्या शतकांतील गुप्तकालीन लिखाणांत तो आढळतो. ताम्रपटांतील य, ल, व, ह, ष, म, क, ग, ट, त हीं व इतर बहुतेक अक्षरें कुतिला वळणाचीं असून त्याचा काल सातव्या शतकाचा धरला जातो. ज आणि द हीं दोन अक्षरें साऊथ इंडियन प्रोटोटाईप वळणाचीं आहेत.

## तुरुष्कोपप्लव

तुरुष्कांच्या त्रासामुळें वेदाध्ययन-संपन्न असा देवशर्मा ब्राह्मण जान्हवीतावरून कोंकणांत ( आपल्या ज्ञातिबांधवांसह ) आला असें नागदेवाच्या ताम्रपटांत सांगण्यात आलें आहे. रा. ब. बांबर्डेकरांनी हे तुरुष्क म्हणजे तूर्क असले पाहिजेत असें मानून तसें स्पष्टीकरण केलें. परंतु चिंतामण विनायक वैद्य यांच्या मतें हा शब्द 'परकीलोक' ह्या अर्थानें संस्कृत वाङ्मयांत सातव्या व आठव्या शतकांत आढळतो. शकांना जिंकून विक्रम साम्राज्याची स्थापना करणाऱ्या कनिष्ट, राजाचा उल्लेखहि, 'तुरुष्कराजा कनिष्क' असाच केलेला आहे ह्या कनिष्काचा काल इ. सनाचें पहिले शतक आहे. ह्यावरून 'तुरुष्कोपप्लव' ह्या शब्दानें, केवळ राजकीय आक्रमण करणारे हे परकी लोक नसून, राजकीय आक्रमणाबरोबरच वैदिक धर्म-कृत्यांना प्रतिबंध करणारे असे हे आक्रमण असले पाहिजेत. कनिष्काचा बौद्धधर्म प्रसाराचा हा उत्तर हिंदुस्थानांतील काल मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

सम्राट अशोकाचा काल इ. स. पूर्व २७३ ते २३२ असून बौद्ध धर्मप्रसारक कनिष्क याचा काल ( इ. स. ७८ ) पहिलें शतक होय. देवशर्मा ह्या दोघांपैकीं कोणातरी एकाच्या कालीं धर्मरक्षणाच्या हेतूनें आपल्या बांधवांसह कोंकणच्या निसर्गरम्य एकांतवासांत आजच्या देवगडला पोहोंचला असावा. त्याचा हिंदळें गावीं तेथील राजानें सत्कार केला असें मोघम सांगितलें आहे. त्याअर्थी त्या राजाचें नांव माहीत नसण्याइतका बराच काल गेला असला पाहिजे. कुणकेश्वराच्या प्रसादानें त्या देवशर्म्याला राज्यश्री प्राप्त झाली. त्याचे पुत्रपौत्र मोठे कीर्तिवंत झाले. ह्या विधानांवरून नागदेवाच्या कालीं त्याच्या घराण्यात सांगण्यांत येत असलेला घराण्याचा पूर्व-वृत्तांत ह्या ताम्रपटांत त्यानें दिलेला आहे. यावरून त्याच्यात व मूळ पुरुष देवशर्मा यांत बराच काल गेला असला पाहिजे.

## जान्हवी तीर संभूतो

नागदेवाच्या ताम्रपटांतील देवशर्मा ज्या श्रीगौड ब्राह्मण संघास घेऊन कोंकणांत आला तो सर्व गौडसंघ जान्हवीतीरावर रहाणारा होता. जान्हवीतीर म्हणजे गंगाकांठ अशी पुष्कळजणांची जी ढोबळ समजूत आहे तो बरोबर नाहीं. 'जान्हवीतीर संभूतो वेदवेदांग पारगः" ह्या उल्लेखानें ह्या ब्राह्मणसंघाच्या निवासस्थानाचा निश्चित बोध होतो. यासाठीं श्री. दातार यांच्या प्रवास वर्णनांतील छोटा उतारा पुढें देतों.—

" The current of the Bhagirathi is very fast and carries with it large blocks of stone and earth that frequently fall into its bed from adjoining mountains. Just after Gangotri, there is a sudden fall of the river near what is known as Gauri Kund, where the swift current of Bhagirathi gets into a cavity and Passes forcibly out from the other end. We are told that there is a circular stony formation over which the current of the Bhagirathi falls into the crevice, resembling the lingam of Lord Sankara.

A few miles below, the Bhagirathi river is joined by a bigger current, called Jada Ganga, locally known as " Jahnavi. " This river takes its rise in Tibet, north of the Mana Pass Its waters are clear and crysstal-like and it is a sight to see the waters of the two rivers bearing different hues joining together and proceeding further on in a rushing current. The scenary at the confluence was of such an absorbing interest that our party was tempted to go down the road to a depth of more than 200 ft to observe the comingling of the two waters at close quarters and to take photographs there. The fascinating view that one gets from here, not only of the surrounding thickly covered forests on the mountain slopes baffles all description. "

( B. N. Datar, Bharat Jyoti 26-9-58 )

## ताम्रपट जान्हवी तीर संभूत आद्य-गौडांचा

नागदेवाचा उपलब्ध ताम्रपट हा कुडाळदेशकर आद्यगौड ब्राह्मण समाजांतील राज्याधिकारी सामंत घराण्याचा असावा हें प्रथम सावंतवाडीचे चीफ् जज्ज मि. जे ए. साल्दाना यांनी प्रतिपादन केलें. रा. ब. वासुदेवराव बांबर्डेकरांनी ' मटगांवचा शिलालेख ह्या ग्रंथांत ' ह्या ताम्रपटाची तपशीलवार चर्चा करून तो कुडाळदेशकर सामंत राजवंशाचा आहे हें सिद्ध केलें.

## कालनिर्णयाच्या चुकांची कारणें

ताम्रपटाच्या कडीवरील एक मूर्ति मारुतीची आहे. दुसरी गणपतीची असावी असें श्री जेकब यांस वाटतें. ताम्रपटांतील हिंदळें हा गांव मालवण तालुक्यांतील साळसी महालांतील असून कुणकेश्वर हा त्याच महालांत आहे अशी जेकबने टीप जोडलेली आहे (सा. गॅ. पा. २९८)

## डॉ. फ्लीटचा लेख

इतिहासकार ज्याला एक मानीत होते तो एक निश्चितपणें नसून ' द ' असे कुतिला वळणाचे तें एक प्राचीन अक्षर आहे. हें अक्षर दशमी ही तिथी सांगण्यासाठी संक्षेपक खुणा म्हणून वापरलें आहे. अशा रीतीनें जुन्या दानपत्रांत कांहीं खुणा वापरल्या जात होत्या हें ख्यातनाम इतिहासकार डॉ. जे. एफ् फ्लीट यांनी एका लेखाद्वारे दाखवून

दिले आहे. जिज्ञासूंनी डॉ. फ्लीट यांचा लेख पहावा. ( Dr, J. F. Fleet, Ind, Ant. Nov. 1888 P. 291 )

## देवशर्म्यांचा 'देवसंघ'

नागदेवाच्या ताम्रपटांतील **देवशर्मा** आणि त्याच्या वेदशास्त्र संपन्न अशा ज्ञातीबांधवांचे कोकणांतील आगमन हें इ. सनाच्या पहिल्या शतकाइतके किंवा त्याहून पूर्वीचे आहे हें आतांपर्यंत दाखवून दिलें आहे. ह्या गौडब्राह्मण संघाचा प्रमुख देवशर्मा असल्यानें ह्या संघाला देवसंघ असेंहि संबोधित. हा आद्यगौड ब्राह्मणसंघ जेथें उतरला व स्थाईक झाला त्या भागाला आज देवगड अशीं संज्ञा आहे. येथून जवळच समुद्रकांठीं प्रसिद्ध कुणकेश्वराचे स्वयंभु देवस्थान आहे. तें दोन हजार वर्षाचे जुने आहे; असे स्थानिक लोक सांगतात. देवालयाची बांधणी द्रविडियन आहे. येवढ्या दीर्घकालावधींत आतां त्याच्या मूळ स्वरूपांत फरक पडल्यास नवल नाहीं. "ताम्रपटांतील 'हिंदळे' हा गांव देवगड तालुक्यांतच आहे. एका बाजूस नदी दुसऱ्या बाजूस डोंगर तिसऱ्या बाजूस मुणगें व चौथ्या बाजूस समुद्र आहे. येथें ऐतिहासिक अवशेष आढळतात. दक्षिणेच्या बाजूस 'भैरवाची घांटी' दिसते. तिची सुबक बांधणी पहातां माइनदेवामागून आलेल्या भैरवदेवराजानें ती बांधली असावीं असे सांगतां येते. हिंदळें येथें भैरवाचें देऊळहि आहे. तेंही त्यानें बांधलें असावें. गांवाच्या तीन बाजूंस बांधलेले पांच तलाव आहेत.

पश्चिमेचा तलाव 'देम' नांवाच्या पुरुषाच्या नांवानें प्रसिद्ध आहे. त्याला हल्ली ब्राह्मणाचें तळें म्हणतात. गांवानजिक सहा शिखरावर भैरवगड नांवाचा डोंगरी किल्ला आहे." ( म. गां. शि टिप्पणी पृ १२ ) हा गौडब्राह्मण समाज देवबाग येथें समुद्रास मिळणाऱ्या कर्लीनदीच्या कांठानें पाट, परुळें, म्हापण, तेंडोली, चेंदवण, वालावल, नेरूर, धामापूर, कुडाळ अशी आपली मुख्य वसाहत वसवून ह्या ठिकाणीं पूर्वी रहाणाऱ्या रानटी लोकांना पिटाळून लावलें असेल आणि जे शरण आले त्यांना त्यांनी आश्रयास ठेवलें असेल मूळच्या लोकांचीं जीं दैवतें होतीं त्यांचा त्यांनी ग्रामदेवता म्हणून स्वीकार केला असेल. कुडाळप्रांतांतील देवस्थान व्यवस्थेंत वेगळेपणा आहे आणि तो अभ्यसनीय आहे. येथील देवस्थानांचा, देवस्थान व्यवस्थेचा, संस्कृतीचा, कुडाळी भाषेचा अभ्यासकरणारांनाच 'कुडाळदेशकर' हें नांव ज्या आद्यगौड ब्राह्मणांना लावण्यांत येतें, त्यांच्या महत्तम कार्याची कल्पना येईल. कुडाळदेशाचे आजचे वैभव व संस्कृति यांचे कुडाळदेशकर हे जन्मदाते होत.

नागदेवाच्या ताम्रपटांतील मूळ पुरुष देवशर्मा ज्या गौडब्राह्मणसंघाचा प्रमुख होता तो देवसंघ, आद्यगौड ब्राह्मणसंघ होता. सोमदेवसूरी ह्या नांवाचा एका जैन कविनें शके ८८१ च्या सुमारास '**यशःस्तिलक**' नांवाचा संस्कृत ग्रंथ लिहिला आहे. त्या ग्रंथांत त्यानें आपली गुरुपरंपरा **देवसंघ–यशोधर नेमिदेव–व–सोमदेव** अशी दिली आहे. स्वतः विषयीं माहिती देतांना सुरवातीसच त्यानें "श्रीमानस्ति स देवसंघतिलको देवो यशोपूर्वकः" असें म्हटलें आहे. ह्या सोमदवसूरीला चालुक्यराजा तिसरा अरिकेसरीन यानें शके८८१ ला

दिलेलें एक कानडी दानपत्र पुण्याच्या भा. इ. सं. मंडळानें प्रसिद्ध केलें आहे. त्यांत सोमदेवाच्या गुरुपरंपरेचा उल्लेख "**श्रीगौड संघ मुनिमान्य** कीर्तीनाम्ना यशोदेव इति प्रजेज्ञे" असा आला आहे. यावरून यशःस्तिलकांतील देवसंघ आणि ताम्रपत्रांतील श्रीगौड-संघ हे दोन्ही शब्द एकाच अर्थानें आले आहेत हे दिसून येतें. श्रीगौड—गौडाद्य—आणि आद्यगौड हे समानार्थी शब्द असून त्यासंबंधींचें विस्तृत विवेचन कुडाळदेशकरांच्या पहिल्या भागांत देण्यांत आलें आहे तें पहावें. परभणी ताम्रपटांतील महत्वाचा भाग मी पुढें देत आहे.

## अरिकेसरीनचापरभणी ताम्रपट शके ८८१

(२२ ते ३२)

"श्री गौडसंघे मुनिमान्यकीर्तिनाम्ना यशोदेव इति प्रजेज्ञे। बभुव यस्योग्र तपः प्रभावात्समागमः शासन देवताभिः। शिष्योभवत्तस्य महर्द्धिभाजः स्याद्वादरत्नाकर पारदश्वा। श्रीनेमिदेवःपरवादिदर्प्पद्रुमावळीच्छेद कुठार नेमिः तस्मातपःश्रियो भर्त्तार्ल्लोकांना हृदयंगमाः। बभूवुर्बहवः शिष्या रत्ना निव तदाकरात्॥ तेषां शतस्यावरजः शतस्य तथाभवत्पूर्व्वज एव धीमान्। श्रीसोमदेवस्तपसः श्रुतस्य स्थानं यशोधाम गुर्णोज्जितश्रीः॥ अपिच्चयो भगवानादर्शस्समस्त विद्यांना विरचयिता यशोधर चरितस्य कर्ता स्याद्वादोपनिषदकवियता चान्येवामपि सुभाषितानाम खिळ महासामन्त प्रान्त पर्य्यस्तोतंसस्रक्सुरभिचरणस्स कळ विद्वज्जन कर्णावतंसी भवद्यशः पुण्डरिकः सूर्य्य इव सकळावनिभुतां शिरःश्रेणिषु शिखण्ड मण्डनाय मानपाद पद्मोभूत्॥ स्वस्त्यकाळवर्षदेव श्रीपृथ्विवल्लभ महाराजाधिराज परमेश्वर परमभट्टारक श्रीमदमोघवर्षदेव पादानुध्यात प्रवर्द्धमान बिजय राज्य श्रीकृष्णराज देवपाद पद्मोपजीविना॥

(द. म. इ. सा. खंड २ रा पा. ५१)

## भाषांतर

श्रीगौड संघामध्यें ऋषींना ज्याची कीर्ति मान्य आहे, असा यशोदेव नांवाचा जन्मला. ज्याच्या तपःश्चर्येच्या प्रभावामुळें शासनदेवतांशीं भेट झाली. त्याचा भरभराटीस आलेला तो श्रीनेमिदेव हा शिष्य झाला. श्रीनेमिदेव हा स्यातवादरूपी समुद्राच्या पलिकडे ज्याला दिसत होतें व जो प्रतिस्पर्ध्यांच्या गर्वरूपी झाडांच्या पंक्तींचा छेद करीत असे असा; तपोवनाचा अधिपती अशा त्याचे लोकांचें अंतःकरण ओढून घेणार असे पुष्कळ शिष्य होते खाणींतून ज्याप्रमाणें रत्नें निघावीं त्याप्रमाणें त्या शिष्यांत सर्वांत लहान असा आणि त्याच्यापासून शंभर शिष्य निर्माण झाले असा बुद्धिमान श्रीसोमदेव, जो तपाचें आणि विद्वत्तेचें स्थान, आणि जो कीर्तीचें घर, आणि गुणांनी ज्याचें वैभव थोर होतें. शिवाय जो भगवान् असा सर्व विद्यांचा आरसा आणि यशोधर चरित्राचा कर्ता आणि स्यात्वादरूपी उपनिषदांत पारंगत, इतर सुभाषितांचाहि कर्ता, सर्व महासामंतांच्या सीमेवर पसरलेले भूषणरूपी माळेनें ज्याचे पाय सुगंधित झाले होते, आणि जो, सगळे विद्वान त्यांच्या कानांवर यशस्वी कमळाप्रमाणे होता ज्याचे, सुर्याप्रमाणें सर्व राज्यांच्या डोक्यावर पायरूपी कमळ हें शेंडी शोभवीत होतें स्वस्ति.

अकाल वर्षदेव असा जो श्रीपृथ्वीवल्लभ महाराजाधिराज, आणि परमेश्वर परमभट्टारक श्रीमद् अमोघवर्षदेव यांचे पाय चिंतन करणारा आणि ज्याचें राज्य व विजय वाढत आहे अशा श्रीकृष्णराजाच्या पायांमुळें उपजीविका करणारा...

**नागसामंताचा उपलब्ध शिक्का**

हा शिक्का रा. ब बांबर्डेकर यांनी आपल्या 'मठगांवचा शिलालेख' ह्या ग्रंथांत दिलेला असून माझ्या 'कुडाळदेशकर' ग्रंथाच्या प्रथमखंडांत मीं तो दिला आहे. हा शिक्का, त्यांतील अक्षरांचें वळण विचारांत घेतलें तर १२ व्या शतकापासून १४ व्या शतकापर्यंतच्या काळांतील तो आहे हें सहज सांगतां येईल. उपलब्ध असलेल्या नागदेवाच्या ताम्रपटांतील अक्षरांचें व लेखनाचें वळण ह्या शिक्यांतील अक्षरांहून भिन्न व अगोदरचें आहे. यावरून शिक्क्यांतील श्रीनागसामंत हा कुडाळदेशावर राज्य करणारा शेवटचा गौडब्राह्मण राजा होय. त्यानंतर कुडाळदेशाची सत्ता, त्याचे पराक्रमी सेनापति चंद्रभान व सूर्यभान प्रभु देसाई यांचेकडे आली असावी. त्यांच्या मागाहून 'प्रभु देसाई' हेच कुडाळप्रांतावरचे सत्ताधारी होते. मराठे शाहींत ह्या प्रभुदेसायांनी छत्रपति शिवाजीमहाराजांना साह्य केलें होतें. पेशव्यांच्या कारकीर्दींतहि कांही काल त्यांच्याकडे देशमुखी चालली. वरील नाग-सामंताचा सिक्का हा शेवटच्या श्रीमंत नारायण प्रभूनें श्रीदेवनारायणाच्या गळ्यांत टाकलेल्या शिक्क्यांच्या मालिकेत होता. पुढें हे सर्व शिक्के सावंतवाडकर सावंतांनी नेले. कांहीं काल त्यांचा त्यांनी उपयोग केल्याचें ऐतिहासिक कागदपत्रांवरून रा. ब. बांबर्डेकरांनी दाखवून दिलें आहे.

देम नृपाचा ताम्रपट पहातां त्यांत श्रीदेम भूपाल विजय राज्यौ दे कुडुवल पत्तने सुखसंकथा विनोदेन अनवरत राज्य कुर्वाणः सप्त वर्षे ११८५ रुदिरोद्गारी संवत्सरे दिगवळे ग्राम दान केल्याचा उल्लेख आहे. स्वयंभु श्रीदेवाच्या पूजेसाठीं ( कु. दे. पृ. ४६ ते ५६ ) महादेवराय व रामदेवराय हे देमाचे समकालीन होत. कुडाळेश्वराचे देऊळ व कुडाळचा संध्याघाट देमाने बांधला ( शके ११८५ म्हणजे सन १२६३ मध्यें देम सामंत अनवरत राज्य करीत होता. यावरून त्यापूर्वीं त्याच्या घराण्यात राज्य होतें हें निर्विवाद !

—×०×—

# ६ प्रभुदेसाई

१४ व्या शतकांत कुडाळापासून देशापर्यंत सर्व राजसत्ता कु. दे. ब्राह्मणांच्या हाती होती. कुडाळदेशाचा विस्तारहि दक्षिणेस व उत्तरेस बराच मोठा वाढला होता. ग्राम-संस्थेच्या मुख्य अधिकाऱ्यास गांवकर हें नांव होतें. यांनी गांव वसविला. गांव उर्जितावस्थेस आणण्यांत यांचा प्रामुख्यानें भाग होता. गांवांतील लोकांस वैद्यकीयँ बाबतींत, न्यायदानाच्या बाबतींत इतर अडचणीच्या वेळीं गांवकर हे मदत करीत.

गांवांतील लोकांकडूनहि या गांवकरास फार मान मिळे. गांवकराच्या वरचा अधिकारी म्हणजे मतकरी होय. मतकऱ्याच्या ताब्यांत २० पासून ३० गांव असत. 'मतकरी' यावर

तीन प्रभु, १ सामंत व १ नायक असे पांच अधिकारी होते. त्यांना 'बौंबळ व तेनात' म्हणून कांही हान राजाकडून मिळत. या सर्वांवर राजे प्रभुदेसाई हे होते. त्यांनी कुडाळ हें आपलें राजधानीचें शहर केलें होतें. राजवाड्याच्या आसपास ५०० कुडाळदेशकरांची घरें होती.

कुडाळ प्रांतावर सत्ता चालविणारे प्रभु देसाई हे श्री. नागसामंताच्या घरण्यापैकी एक होत. कुडाळच्या राजांनीं आपल्या राज्यांत धर्मक्रांति घडवून आणली होती. **सोनवडें** येथें मठ स्थापन करून **करवीर** व **शृंगेरी** पीठांशीं गुरुबंधूचें नातें त्यांनीं जोडलें. सबंध पंच-महाल कुडाळच्या मौलीस्थानी, कुडाळदेशकरांची राजसत्ता, धार्मिक सत्ता व देवस्थान-व्यवस्था सुरू होती. ही स्थिति १६ व्या शतकाच्या तृतीय पदापर्यंत चालू होती, याच काळांत गोमंतक प्रांतावर देवगिरीचे यादव, मोंगल, विजयनगरकर, बेदरचे बादशाह, विजापूरकर व पोर्तुगीज इत्यादींनीं स्वाऱ्या केल्या. शेवटीं हा भाग पोर्तुगीजांच्या ताब्यांत गेल्यावर समाजस्वास्थ्यावर परिणाम होऊन समाजाची घडी विस्कटली. इंक्विझिशनमुळें समाज हवाल-दील झाला. एका दिवसांत शेंकडों देवळांचा विध्वंस करण्यांत आला.

हजारों लोकांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा सक्तीनें घ्यावी लागली. खावयास अन्न नाहीं, बसावयास जागा नाहीं अशा परिस्थितींत बरेच हिंदू कुडाळ प्रांतांत पळून आले. या वेळीं देशसत्तेचे, प्रांत सत्तेचे व ग्रामसत्तेचे प्रमूख कुडाळदेशकर असल्यामुळें वरील पळून आलेल्या लोकांस मोठा आश्रय कुडाळांत मिळाला.

कुडाळदेशकरांनीं गोमांतकांतून परागंदा होऊन आलेल्या लोकांस दिलेल्या आधाराची कल्पना होईल. त्यांनीं अनेकांस आपल्या हाताखालीं नोकऱ्या दिल्या. राजे प्रभु देसाई यांनीं नाडकर्णी नांवाच्या गृहस्थाची आपल्या प्रधान मंडळांत नेमणूक केली होती. चिटणिसीच्या कामावर **शेणवी** लोकांची नेमणूक करण्यांत आली होती. या गोमांतकस्थ लोकांचा कुडाळ प्रांतांत प्रवेश होऊन कांहीं दिवस लोटल्यावर कुडाळच्या राजघराण्यांत कलीनें प्रवेश केला. या वेळीं बाये प्रभु नांवाचा राजा कुडाळांत राज्य करीत होता. बायेप्रभूस रामजी व गोमजी या नांवाचे दोन मुलगे होते व गणेश नांवाचा एक धाकटा भाऊ भाऊ होता.

गादीवरून कांहीतरी अंतःकलह आपल्या घराण्यांत उत्पन्न होईल याची कल्पना बाये-प्रभूस आली असल्यानें आपला धाकटा भाऊ गणेश यानें आपल्या मृत्यूनंतर गादीवर बसावें अशी त्यानें व्यवस्था केली. गणेशच्या मृत्यूनंतर वडील पुतण्या भानजी व मुलगे रामजी आणि गोमजी यांनीं अनुक्रमें गादीवर बसावें असें त्याचें मत होतें.

बाये प्रभूच्या मृत्युनंतर गणेश प्रभू गादीवर बसला. रामजीनें आपल्या चुलत्यास मदत केली नाहीं. उलट त्यास व चुलतभाऊ भानजी यास पळवून लाविलें व आपण गादी बळका-विली. गणेश प्रभु हा सात्त्विक होता. तो श्रीमद्रामानंदाच्या आश्रयानें सोनवडें मठांत राहूं लागला. रामजीनें श्रींच्या मठास वेढा दिला. शेवटीं श्रीमद्रामानंद व गणेश प्रभु यांनी मठ सोडला. या दिवसापासून कुडाळच्या राज्यास उतरती कळा लागली.

**श्रीमद्रामानंद** व **गणेशप्रभू** नंतर साळशी महालांत जाऊन राहिले. हा महाल कुडाळच्या राज्याचा भाग होता. गादी परत मिळविण्याची खटपट न करता गणेश राजकारणापासून अलिप्त राहिला. त्याचा पुतण्या भानजी यास पुन्हा राज्य मिळविण्याची इच्छा उत्पन्न झाली. तो कुडाळास गेला. नंतर त्यानें रामजीशीं गोडीगुलाबीनें वागण्याचें धोरण स्वीकारलें. बाह्यात्कारें सख्यत्वानें वागणारा भानजी गादी केव्हां मिळेल याची वाट पहात होता. एके दिवशीं रामजी हा रेडी नांवाच्या प्रसिद्ध किल्ल्यावर गेला होता. भानजीहि तेथें गेला. किल्ल्यावरील लोकांस त्यानें वश करून घेतलें व रामजीस एकटा गांठून इं स. १५७३ मध्यें ठार मारलें. भानजी गादीवर असतां, देव दळवी हा त्याचा सेनापति होता. भानजीनें रामजीस मारलें हें कृत्य रामजीच्या मुलांस व गोमजीस आवडलें नाहीं. सेनापति दळवी यासहि ही गोष्ट पसंत नव्हती. म्हणून त्याचा सूड उगविण्यासाठीं सेनापति दळवी यांनीं बंड उभारलें. होडावड्याचे पराक्रमी पुरुष मांग सावंत यास त्यांनीं हाताशीं धरलें.

अर्थात भानजीनें माघार न घेतां विजापूरच्या बादशहाकडे मदत मागितली. बादशहानें त्याप्रमाणें सैन्य पाठविलें. दोन्हीकडील सैन्यांत युद्ध होऊन सावंत व देवदळवी हे दोघेहि ठार झाले. ही घटना १५८० मध्यें घडली. ज्या रामजीचा खून करून भानजी गादीवर आला होता त्या रामजीस दादबा व कानबा असे दोन मुलगे होते. गोमजी नांवाचा एक भाऊहि होता. या तिघांच्या मनांत भानजीस कांहींतरी प्रायश्चित द्यावयाचें होतें.

एक दिवस भानजी कांहीं कामासाठीं मसूऱ्यास गेला असतां हे तिघेहि तिकडे गेले. भानजी राजकीय कामामध्यें गढून गेला असतां गणेश नायकाकडून त्याला बंदुकीची गोळी (१५८४) घातली गेली. नंतर सर्व मंडळी कुडाळास आली. गोमजीस गादीवर बसविण्यांत आलें. गोमजी गादीवर बसल्यानंतर नाग दळवी होडावडेकर यानें देसायांविरुद्ध बंड केलें. गोमजी प्रभु यानें त्यास कैदेंत टाकलें. तो आठ वर्षेपर्यंत कैदेंत होता. नंतर युक्तीनें सुटका करून घेऊन तो बारदेश प्रांतीं पळून गेला. त्यावर गोमजीनें आपलें पुतणे दादबा व कानबा यांना त्याच्यावर पाठविलें. ते दोघेहि मारले गेले. नाग दळव्याचा नाश करण्यासाठी देसायांनीं विजापूरच्या बादशहाची मदत घेतली. मीर मुरादखान नामक सरदार कांहीं फौज घेऊन देसायांच्या मदतीस आला. सातर्डे येथें त्यांनीं नाग दळवी व भीम दळवी या दोघांस गांठून ठार (१६५० मध्यें) मारीलें व बंडाचा मोड झाला.

यापुढील पन्नास वर्षें स्वस्थता वा शांतता या प्रांतात लाभली नाहीं. १६ व्या शतकांत कुडाळचे मुख्य बारा भाग होते. प्रत्येक भागास तर्फ असे म्हणत. तर्फेवरी मुख्य अधिकाऱ्यास 'नाईक' असें म्हणत. १७ व्या शतकाच्या आरंभीं हल्लींचे राजे **सावंत भोसले** यांच्या वंशांतील मूळ पुरुष खेम सावंत **माणगांव 'तर्फेवर' नाईक** होता. तर्फेचा वसूल राजाकडे पाठवावयाचा असतो. कुडाळच्या राज्यांतील अंतर्गत कलह पाहून खेम सावंतानें स्वतःची सत्ता स्थापन करण्याचें ठरविलें. त्या दृष्टीनें पाहिली पायरी म्हणून तर्फेचा वसूल राजाकडे पाठविण्याचें बंद केलें. हळु हळु इतर तर्फांचा वसूलहि तो बळजबरीनें वसूल करूं लागला. अशा रीतीनें खेमसावंतानें राज्यांत पुंडाई सुरू केली. दरम्यानच्या

कालांत म्हामद राजा नांवाचा विजापूरकरांचा सरदार पारपोली घाट उतरून येत असतांना त्याच्यावर खेम सावंतानें स्वारी केली. त्याचा पराभव करून त्यास जीवदान दिलें. हा सरदार विजापूरकरांकडे गेल्यानंतर विजापूरच्या बादशहाकडे खेमसावंताच्या शौर्याची व दयाळू स्वभावाची फार स्तुति केली. बादशहा खूष झाला. त्यामुळें खेमसावंतास इ. स. १६२७ मध्यें थोड्या भागाची देशमुखीची सनद मिळाली. अशा रीतीनें कुडाळच्या राज्यांत या सुमारास खेमसावंतास कांहीं अंशीं प्रवेश मिळाला. ओटवणें येथील वरदे नांवाच्या कुलकर्ण्यास त्यानें आपला दिवाण नेमलें. हे **वरदे** पुढें **सबनीस** या नांवानें प्रसिद्धीस आले. प्रभुदेसायांच्या प्रधानमंडळांत त्या वेळीं नाडकर्णी नांवाचे शेणवी होते. खेमसावंतांचा उदय होऊं लागतांच इतर शेणवी सावंताकडे गेले. मात्र स्वामिभक्त नाडकर्णी सावंतास कधींहि मिळाले नाहींत.

इ. स. १६२७ पासून इ. स. १६९६ पर्यंत प्रभु देसाई व सावंत भोंसले या उभयतांची सत्ता कुडाळ प्रांतावर होती. सावंतांची सत्ता वाढत होती व कुडाळदेशकरांची कमी होत होती. या घराण्यांत पूर्वी दोन खून झाले असल्यामुळें लोक या घराण्यावर नाराज होते. सावंताच्या घराण्यांत खेमसावंतांचा मुलगा लखम सावंत व नातु–दुसरा खेम सावंत हे बरेच पराक्रमी पुरुष होऊन गेले. या उभयतांनीं कुडाळचा बराच भाग व्यापला. इ. स. १६९१ मध्यें **सखोजी** हा प्रभु देसायांत एक नवीन शत्रु उत्पन्न झाला. याच्या त्रासात कंटाळून बारदेशांत देसायांनीं आपलें कुटुंब नेऊन ठेविलें. सखोजी व देसाई यांच्या अनेक वेळां लढाया झाल्या. त्यांत कोणासच म्हणण्या सारखें यश मिळालें नाहीं. नंतर सखोजी वेंगुर्लें येथें राहिला. त्याच्या मनांतून सावंत व कुडाळ देशस्थ या दोघांसहि जिंकावयाचें होतें. आरवली येथें झालेल्या सावंताबरोबरच्या लढाईत सखोजीचा मेहुणा पडला. सखोजीला पळून जावें लागलें. नंतर सखोजीनें सावंताशी तह करून दोघांनीं कुडाळदेशकरांचें ठाणें कुडाळ यावर हल्ला करण्याचें ठरविलें. दोघांनी स्वारी केली. बरेच दिवस दोघांचा तळ कुडाळांत पडला होता. देसायांच्या मदतीस सरदारखान व पीरखान हे दोन मुसलमान सरदार आले. त्यामुळें राघोजी व खेमसामंत यांस गोव्यांत पळून जावें लागलें. बांदे पेडण्यापर्यंत त्यांचा पाटलाग सरदारखानानें करून त्या टिकाणीं आपली ठाणीं बसविलीं. थोड्या दिवसांनीं खेमसामंतांनीं ही ठाणीं परत घेतलीं. कुडाळचा सुभेदार भानजी गोपाळ व बांद्यांचा सुभेदार आवजी नागनाथ यांवर त्यानें चाल केली व बारदेशपर्यंत पाठलाग करून त्यांना ठार मारिलें. ही घटना १६९६ मध्यें घडली. नारायण प्रभु व जोगण प्रभु कुडाळच्या किल्याचा आश्रय धरून होते. त्यांच्याबरोबर सावंतांनीं लढाई केली. जोगण प्रभुस गोळी लागली. नारायण प्रभु मुलांबायकोसह पळून गेला. अशा रीतीनें १६९७ मध्यें कुडाळ देशस्थ प्रभु सत्तेचा शेवट झाला. कुडाळहून १६९७ मध्यें पळून गेलेला नारायण प्रभु याचा मुलगा दादाजी यानें १७५६ मध्यें आपली नष्ट झालेली सत्ता पुन्हा मिळविण्याचा शेवटचा प्रयत्न केला. पेशव्यांकडे त्यानें मदत मागितली. पेशव्यांनीं हें मान्य करून राजपुरच्या सरदार नारो त्रिंबकला प्रभु देसायांस मदत करण्याविषयीं लिहून पाटविलें. नारो त्रिंबक हा ३००० फौज घेऊन घेऊन कोकणांत उतरला. नेरूरपर्यंत त्यानें चाल केली. दर-

त्यानंच्या कालांत सावंतांनीं विठ्ठल विश्राम सबनीस यांचे मार्फत पेशव्यांचें मन वळवून नारी त्रिंबक यांस माघारें येण्याविषयीं हुकूम आणून लाविला. त्यामुळें प्रभु देसायांचा प्रयत्न व्यर्थ गेला. यानंतर कुडाळदेशकरांकडून पुन्हा राजसत्तेसाठीं प्रयत्न केला गेला नाहीं.

—:०:—

# ८ कुडाळदेशकरांची गुरुपरंपरा

## (१) स्वर्णवट (सोनवडें) मठ

इ. स. च्या १२ व्या शतकांत, ज्याप्रमाणें जैन धर्माचें प्राबल्य कमी करून ब्राह्मणी धर्मास अग्रगण्यत्व देण्यांत आलें, त्याचप्रमाणें १३ व्या शतकाच्या अखेरीस, ब्राह्मणी धर्माचें मुख्यांग मानलेल्या वैदिक धर्माच्या प्रसारासाठीं, कुडाळप्रांतीं एक धर्मपीठ स्थापन करण्यांत आलें. कुडाळदेशकरांनीं हें पीठ आपल्या राजधानीच्या शहरानजीकच स्वर्णवट (सोनवडे) या गांवीं स्थापिलें होतें. या पीठाचे आद्यधर्मगुरु **श्रीमद्विद्यापूर्णानंद** नांवाचे होते. आद्यशंकराचार्यापासून शृंगेरी मठाच्या दहाव्या परंपरेचे प्रसिद्ध **विद्याशंकरतीर्थ** हेच श्रीमद्विद्यापूर्णानंदांचे गुरू होत. विद्याशंकरतीर्थ प्रायः **शंकरानंद** या नांवानें प्रसिद्ध होते. यांची समाधी वसई तालुक्यांतील **निर्मळ** गांवीं आहे. करवीर–संकेश्वर पीठाचे आद्य धर्मगुरुही याच शंकरानंदाचे शिष्य. करवीर–संकेश्वर पीठ व स्वर्णवट पीठ हीं दोन्ही पीठें एकाच काळीं–कदाचित् एकाच उद्देशानें–स्थापन झालीं. पहिल्या पीठास जसा 'सोमवंशी कृष्णराय' याचा आश्रय होता, तसा **स्वर्णवट** पीठास राजे **सूर्यभान चंद्रभान** यांचा आश्रय होता. **श्रीमद्विद्यापूर्णानंदांचें पूर्वाश्रमीचें उपनांव सामंत देसाई** असें असून, त्यांच्याच जागेंत स्वर्णवट येथील मठ बांधला होता.

इ. स. १३ व्या शतकाच्या अखेरीस, कुडाळदेशकरांच्या ज्ञातीवरील धर्माधिकार, या स्वर्णवट येथील पीठाच्या हातीं गेला. त्यापूर्वी तो कुडाळदेशकरांचे जे अठरा गांव मागें सांगितले आहेत, त्या गांवांतील ज्ञातिगृहस्थांच्या हातीं होता.

शके १२५७ मध्यें चंद्रभान–सूर्यभान या राजबंधूंनीं आपल्या राज्यांतील प्रत्येक गांवांतून या स्वज्ञातीच्या धर्मसंस्थानास उत्पन्न लावून दिलें होतें. शिवाय सामंत, प्रभु, मंतकरी वगैरे अधिकाऱ्यांकडून सरंबळ आरवली, चंदवण, वालावल, सोनवडें, शिरवडें, बांव, नेरूर, मसुरें, वराड इत्यादि गांवांतील कित्येक जमिनी इनाम करून दिल्या होत्या. नित्य नैमित्तिक कृत्यांबद्दल व अतिथि–अभ्यागतांच्या सोईसाठीं स्वतंत्र नेमणुकाही असत.

या स्वर्णवट (सोनवडें) संस्थानांत इ. स. च्या १३ व्या शतकाच्या द्वितीयार्धापासून इ. स. च्या १६ व्या शतकाच्या द्वितीय पादापर्यंत पुढें दिलेले मठाधिपति होऊन गेले :—

(१) श्रीमद्विद्यापूर्णानंद
(२) प्रज्ञानानंद

( ३ ) भूमानंद
( ४ ) पूर्णानंद ( दुसरे )
( ५ ) ब्रह्मानंद
( ६ ) पूर्णानंद ( तिसरे )
( ७ ) श्रीमद् रामानंद

वरील काळांत लांबलांबचे वैदिक, शास्त्रीय, पुराणिक, हरिदास श्रीमठी येत. राजघराण्यांतील पुरुष तर नित्य श्रींच्या दर्शनास येऊन महत्त्वाच्या राजकारणांत त्यांचा सल्ला घेत. शेवटचे मठाधिपति श्रीमद्रामानंद यांनीं मठांतून आपले पाय बाहेर काढल्यापासून स्वर्णवट ( सोनवडें ) मठ मठाध्यक्षांस अतरला व स्वर्णवट मठांतील मठाधिपतींच्या परंपरेची समाप्ति झाली. हा मठ सावंतांच्या मदतीने सारस्वतांनी आपल्या ताब्यांत घेतला.

## ( २ ) चिंदर मठ

श्रीमद्रामानंदांनीं स्वर्णवट मठ सोडल्यावर ते साळशी महालांत जाऊन राहिले. तेथें कांहीं दिवस घालविल्यावर ते काशीस गेले. तेथें दशाश्वमेध घांटीं कांहीं काळ घालवून पुन्हा ते साळशीस आले. तेव्हां गणेश प्रभूनें साळशी महालांतील चिंदर गांवीं एक लहानसा मठ बांधिला व त्यांत श्रीमद्रामानंद राहूं लागले. त्यांनी श्रीमत्सदानंद यांना आपला शिष्य करून चिंदरमठ संस्थानचा सर्व कारभार त्यांच्याकडे सोंपविला आणि एका चैत्र वद्य प्रतिपदेच्या दिवशीं ते समाधिस्थ झाले. श्रीमद्रामानंदांचें चिंदर येथील समाधिस्थान जागृत असल्याविषयीं त्या प्रांतीं समजूत आहे. या मठांतील मठाध्यक्षांची परंपरा पुढीलप्रमाणें आहे:—

( १ ) श्रीमद्रामानंद
( २ ) श्रीमत्सदानंद
( ३ ) श्रीमत्भवानंद
( ४ ) श्रीमत्पूर्णानंद

यापैकीं श्रीमत्सदानंद व श्रीमत्भवानंद यांनीं आपल्या कारकीर्दीचीं बरींच वर्षें काशीक्षेत्रांत घालवून तेथेंच ते समाधिस्थ झाले. या दोघांनींही संस्कृतमध्यें कांहीं ग्रंथ लिहिले आहे.

## ( ३ ) गोळवण मठ

कुडाळदेशकर घराण्यांतील तंटेबखेडे व अंदाधुंदी इत्यादीस कंटाळून राजकीय चळवळीपासून किंचित दूर अशा स्थळीं आपला मठ स्थापावा असें योजून गोळवण नांवाच्या आपल्या ‘ मूळ भुंके ’ च्या गांवांत ज्ञातीनें एक नवीन मठ स्थापन केला. हा मठ ‘ **पूर्णानंद मठ** ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. हा मठ फार मोठा नसून त्याच्या सभोंवार एक लहानसा तलाव व अश्वत्थ वृक्ष आहे. मागील बाजूस फरसबंदी केलेला एक वटवृक्ष आहे. त्यास संध्या मठ असें म्हणतात. श्रीमत्पूर्णानंदांनीं आपला बराच काळ काशी क्षेत्रीं गुरुसान्निध्यांत

घालविला व इ. स. १६४४ मध्यें संस्थानचा कारभार श्री. सहजानंदांच्या हातीं सोंपवून माघ शु॥ १५ स गोळवण मठांत समाधी घेतली. या मठाधिपतींची परंपरा खालीं दिल्याप्रमाणें आहे :—

( १ ) श्रीमत्पूर्णानंद
( २ ) श्री सहजानंद
( ३ ) श्री विज्ञानानंद

श्रीविज्ञानानंदांच्या नंतर १७०० ते १७४५ या काळांत गोळवण मठांतील मठाधिपतीच्या चार पिढ्या झाल्या. पुढें मठाचा कारभार कोणी चालवावा यासंबंधांत तंटे निर्माण होऊन या मठांतील मठाध्यक्षांची परंपराही लोप पावली.

## ( ४ ) दाभोली मठ

कुडाळदेशकरांच्या राजसत्तेच्या ऱ्हासाबरोबर धार्मिक सत्तेचाही ऱ्हास ओढवला. गोळवण मठास अनेक संकटांनीं घेरलें. मठाचा राजाश्रय नाहींसा झाला. मठाधिकाऱ्यांत तंटे माजले आणि मठसंबंधींचा सर्व बोजा ज्ञातीवर पडला. तेव्हां स्वाभिमानी ज्ञातिबांधवांनीं इ. स. १७४५ मध्यें कुडाळ प्रांतांतील **दाभोली** नावाच्या मध्यवस्तीच्या गांवीं एक मठ उभारला. त्यास बाळे प्रभू सेडणकर यांनीं मठ बांधण्यासाठीं आणि केशव प्रभू व गोपाळ प्रभू यांनीं किरकोळ खर्चासाठीं म्हणून जमिनी इनाम दिल्या.

या दाभोली मठाचे पहिले धर्मगुरू श्रीमत्पूर्णानंद हे होत. यांचा अधिकार असामान्य होता. दोन हाताशी दोन वाघ घेऊन हे नेहमीं ध्यानस्त बसत ! केव्हां केव्हां वाघावर बसून फिरावयास जात ! श्रीमत्पूर्णानंद दाभोली मठात इ. स. १७६३ (चैत्र वद्य. ४ शके १६८५) मध्यें समाधिस्त झाले. दाभोली मठातील मुख्य समाधि त्यांची आहे. श्रीमत्पूर्णानंदापासून दाभोली मठाची मठाध्यक्षांची परंपरा पुढीलप्रमाणे :–

( १ ) श्रीमत्पूर्णानंद
( २ ) श्री चिदानंद

श्री चिदानंदांनीं शिष्य करण्याचें नाकारलें व तें समाधिस्त झालें. यानंतर संस्थानचा कारभार कसा चालावा हा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हां अठराही गांवचे अधिकारी मठांत एकत्र येऊन त्यांनीं, चेंदवण येथील नाईक नांवाच्या इसमास शृंगेरी मठास नेण्याचें ठरविलें. शृंगेरीस गेल्यानंर तेथील मठाचार्यांनीं सदरहू नाईक यांस संन्यास–मंत्रोपदेश देऊन पट्टाभिषिक्त केलें व त्यांचें नांव कृष्णाश्रम असें ठेविलें आणि येथून पुन्हा दाभोली मठांतील गुरुपरंपरा सुरु झाली. ती अशी :–

( १ ) श्रीमत्कृष्णाश्रम
( २ ) शांताश्रम
( ३ ) पूर्णाश्रम
( ४ ) कृष्णाश्रम
( ५ ) शांताश्रम
( ६ ) कृष्णाश्रम
( ७ ) शांताश्रम
( ८ ) सिद्धाश्रम

| | |
|---|---|
| (९) कृष्णाश्रम | (१५) सिद्धाश्रम |
| (१०) शंकराश्रम | (१६) विमलानंद |
| (११) कृष्णाश्रम | (१७) शिष्यस्वमी शरीपूर्णानंद |
| (१२) पूर्णाश्रम | (१८) श्रीशंकरानंद |
| (१३) शंकराश्रम | (१९) श्री ब्रह्मानंद (१९६६) |
| (१४) कृष्णाश्रम | (२०) श्री रामानंद (१९७३ पासून) |

कुडाळदेशकर ज्ञातींत दाभोली मठाच्या धार्मिक सत्तेचा अधिकार फार मोठा आहे. या मठास आपली ज्ञात एखाद्या पवित्र तीर्थक्षेत्राप्रमाणें मान देते. दाभोली मठाची सविस्तर माहिती ' श्री मठ दाभोली येथील तंस्थानचा संक्षिप्त इतिहास ' या पुस्तकात आलेली आहे.

—×०×—

# ९ रामदासी व गिरिसंप्रदाय

## कुडाळदेशकर ज्ञातींतील रामदासी संप्रदाय

परमसमर्थ श्रीरामदास स्वामी यांच्या धर्मजागृतीच्या कामगिरीचें ॠण संबंध महाराष्ट्रावर आहे. त्या ॠणाचा वाटा अंशतः तरी फिटावा म्हणून कुडाळदेशकर आद्यगौड ब्राह्मण ज्ञातींत समर्थाची अखंड स्मृति रामदासी परंपरेमुळें कायम आहे.

कुडाळ प्रांतात रामदासी संप्रदायाचे तीन मठ आहेत. पैकी **मांडकुली** व **कोचरें** यांत गुरुशिष्यत्वाचें नातें असून, **कसबें पाट** येथील मठपरंपरा वरील दोंहोंहून किंचित निराळी आहे.

## १० मांडकुली मठ

कल्याणस्वामी आणि दत्तात्रय स्वामी हे दोघे बंधु समर्थाचे शिष्य असून समर्थ मंडळांत महंतपद प्राप्त झालेले असे मठाधीश होते. कल्याण स्वामींचा मठ डोमगांव येथें व दत्तात्रय स्वामींचा मठ शिरगांव येथें होता. कल्याण स्वामीचे शिष्य महंत **जगज्जीवनस्वामी** व **जगज्जीवनाचे शिष्य रघुनाथस्वामी** हेच मांडकुली मठाचे संस्थापक होत. श्रीरघुनाथस्वामी हे परुळे गांवचे सांख्यायन गोत्री सामंत. गुरुच्या आज्ञेवरुन त्यांनीं मांडकुलीस मठ बांधून मारुतीची स्थापना केली. रघुनाथस्वामीनीं उपदेशपर अशी बरीच कविताबद्ध ग्रंथरचना केली होती. मांडकुली मठांत रामजयंती, हनुमानजयंती इत्यादि उत्सव मोठ्या थाटामाटांत होतात. रघुनाथस्वामीनीं आपल्या अनंत नांवाच्या मुलास मठाधिपत्य देऊन १७३० मध्ये समाधी घेतली. अनंत स्वामीही मोठे अधिकारी पुरुष व महंत साक्षात्कारी होते. त्यांची कृष्णाबाई नांवाची एक भगवद्‌भक्त शिष्या होती. आपल्या गुरुजीवर व रघुनाथस्वामीवर केलेल्या तिच्या आरत्या आजही उत्सवप्रसंगी मठांत गायिल्या जातात. या मठास कायमचें असें उत्पन्न नाहीं. बहुतेक व्यवहार भिक्षेवर चालतो. या मठाची परंपरा अजतागायत चालू आहे.

## २. कोचरें मठ

मांडकुली मठाचे अधिपती अनंतस्वामी यांचे शिष्य रघुनाथबुवा यांनीं कोचरें येथें एक मठ बांधून मारुतीची स्थापना केली. रघुनाथबुवा मूळ मड्डुरें गांवचे. या कोचरें गावांस ७ व्या शतकांतील एका ताम्रपटावरील दानलेखांत 'कोच्चूरक' व १४ व्या शतकांतील एका लेखांत 'कुच्चर' हीं नांवें दिलेलीं आडळतात. या मठास कोचरें गांवांतील **भारद्वाज-गोत्री रामचंद्र प्रभु** यांच्या घराण्यानें आपले बहुमोल उत्पन्न दिलें होतें. रघुनाथबुवा यांच्या मागाहून परंपरेस वाहिलेले असे त्यांचे शिष्य झाले नाहीत. परंतु रामनवमी, हनुमान जयंती, जगज्जीवनस्वामींची पुण्यतिथि इत्यादि उत्सवप्रसंगी वरील प्रभु घराण्यांतील पुरुष भगवी वस्त्रें नेसून देवकार्य करतात.

## ३ 'कसबा पाट' येथील मठ

शिरगांव मठाचे अधिपति दत्तात्रयस्वामी यांच्या मागाहून त्यांचे पुत्र राघवस्वामी व पौत्र भीमस्वामी हे शिरगांव मठाचे अधिपति झाले. 'भक्त लीलामृत' हा ग्रंथ भीम-स्वामीनीच इ. स. १७९७ सालीं लिहिला. या भीमस्वामींचें शिष्य **सितारामस्वामी** हेच **पाट** येथींल मठाचे पहिले मठाध्यक्ष होत. सीतारामस्वामी हे परुळें गांवचे धनंजयगोत्री सामंत. यांच्या घराण्यांतील पूर्वज बांबर्डे गांवीं राहूं लागल्यानें यांच्या घराण्याचें उपनांव 'बांबर्डेकर' झालें. श्रीमद् **विमलानंदस्वामी** आणि कै. नानासाहेब बांबर्डेकर हे याच घराण्यांतील होत सीतारामस्वामी तीर्थयात्रेसाठी नृसिंहवाडीस गेलें असतां तेथे भीमस्वामीशी त्यांची गां - पडली. पुढें भीमस्वमीनाच गुरू करून गुरूंच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं दिलेले राम-पंचायतन घेऊन ते पाट गावीं आले. तेथील ग्रामाधिकारी हरबा पाटील यांचेकडे श्रीराम-पंचायतन ठेवून कांहीं काळानें त्यांनीं चतुर्थाश्रम घेतला व त्यानंतर लवकरच समाधी घेतली. हरबा पाटील यांनीं श्रीरामपंचायतनाची देवालय बांधून स्थापना केली आणि बुवांचें समाधि-गृह बांधून त्याला उत्पन्न लावून दिलें. श्रीराममंदिर आणि मठ यांत नित्यपूजा, नैवेद्य, नंदादीप वगैरे अखंड चालू असून श्रीरामनवमी वगैरे उत्सव तेथें होता.

अशा प्रकारें रामदासी संप्रदाय, गिरिसंप्रदाय, वारकरी संप्रदाय व मठपरंपरा इत्यादींच्या द्वारें आमच्या समाजांत केवढी धर्मनिष्ठा नांदत आली आहे याची कल्पना होते.

## आद्यगौड ब्राह्मण ज्ञातींतील गिरिसंप्रदाय

कुडाळदेशकर ब्राह्मण ज्ञातींत खानोली येथील वत्सगोत्री घराण्यांतील हरिप्रभू नावाच्या एका उपनीत बटूनें सुमारें ५०० वर्षांपूर्वी उत्तर हिंदुस्थानतून आलेल्या ईश्वरगिरी नांवाच्या सिद्ध गुरुपासून गिरिसंप्रदायाची दीक्षा घेतली. त्यांचें शिष्यत्व पत्करलें व मठस्थापना करून संप्रदायपरंपरा चालू केली.

या गिरीसंप्रदायाचा मुख्य मठ **खानोली** गावांत 'निवती' येथें आहे. ह्या संप्रदा-याच्या स्वामींना परिव्राजक तपोनिधि असें संबोधिल्याचे जुन्या कागदांत दाखले मिळतात. त्यांची परंपरा दशनामसंन्याशातील श्रीनरतोटचार्यान्वयी आहे. श्रीमत्तोटकाचार्यांचा मठ

बद्रिकाश्रमांत असून त्या मठाच्या श्रींना गिरी, पर्वत आणि सागर हीं अभिधानें आहेत. त्यावरून हा संप्रदाय शांकरपरंपरेंतील परिव्राजकांचा ठरतो. खानोली येथें 'निवती मठ' स्थापन झाला त्या वेळीं सोनवडें येथें आपला श्रीशंकराचार्यान्वयी मठ होता व तेथूनच आपल्या ज्ञातींत आचार, व्यवहार, प्रायश्चित्तादि कामें चालत असत. खानोली मठाशिवाय या गिरिसंप्रदायाचें **केळूस, तेंडोलीं, वज्राठ** व **उद्धवगिरी** असे मठ कुडाळप्रांतीं आहेत. खानोली येथील निवती मठांत तपोनिधि हरिचरणगिरी यांची मुख्य समाधी असून जवळच आणखी पांच समाधी आहेत व बाहेरील मधल्या चौकांत चार समाधी मिळून खुद्द मठांत नऊ समाधी आहेत. मठाबाहेर पिंपळासमोर हरिचरणगिरींचा वाणी जातीचा एक शिष्य होता. त्याची समाधी आहे. मठांतील नऊ समाधीपैकीं एक वाघाची आहे. मठांतील नैमत्तिक प्रसंगीं ह्या वाघाच्या समाधीस नैवेद्य अर्पण करण्यांत येतो. हा वाघ हरिचरणगिरींचा आवडता होता. ह्या गिरिपरंपरेंतील कांहींचीं नांवें पुढील प्रमाणें आहेत :—

**हरिचरणगिरी,** नागेंद्रगिरी, उद्धवगिरी, विश्वनाथगिरी, भगवानगिरी **दत्तगिरी.**

दत्तगिरी हे निवती मठांतील शेवटचे अधिपति होत. त्यांचा जन्म शके १७७४ मध्यें **नरसोबावाडी** येथें झाला व शके १८१२ सालीं त्याच क्षेत्रांत त्यांनीं जलसमाधी घेतली. निवती मठाशिवाय इतर मठांतून ह्या मठाची शिष्यप्रशिष्यपरंपरा चालू होती.

— ×०× —

# १० संतपरंपरा

राष्ट्राच्या अगर समाजाच्या सर्वांगीण उन्नतींत त्याच्या पारमार्थिक ऐश्वर्याचा भाग फार मोठा असतो. ज्ञानेश्वर–तुकारामादि थोर संतांनीं अमोल ग्रंथरचना करून महाराष्ट्राची पारमार्थिक सत्ता उच्च कोटीला पोहोंचविली आणि त्यामुळेंच संबंध महाराष्ट्रास त्यांचीं नांवें आज भूषणास्पद होऊन राहिलीं आहेत. आपल्या ज्ञातींतही असे थोर पुरुष होऊन गेले आणि आजतागायत त्यांची परंपरा कायम आहे. त्यांनीं केवळ कुडाळ प्रांतापुरतें किंवा कुडाळदेशकर ज्ञातीपुरतेंच आपलें पारमार्थिक एश्वर्य मर्यादित ठेवलें नाहीं, तर हिंदुस्थानच्या कोणत्याही भागांत व कोणत्याही ज्ञातीस त्यांचीं नांवें पूज्य आणि भूषणावह होतील अशी त्यांची कार्यावळी आहे. या संतपरंपरेंतील अनेक थोर विभूतींची माहिती आज उपलब्ध नाहीं. त्यांनी केवळ नामनिर्देशानेंच उल्लेखावें लागत आहे.

( १ ) अंबरनाथ
( २ ) गंबरनाथ
( ३ ) गोपाळ बोध
( ४ ) रुक्माजीबुवा
( ५ ) **श्रीमत्पूर्णानंद**
( ६ ) **श्रीचिदानंद**
( ७ ) **विमलानंद**
( ८ ) विश्वानंद
( ९ ) रघुनाथबुवा रामदास
(१०) अनंतबुवा रामदास
(११) श्रीधरस्वामी उर्फ मौनिबुवा
(१२) केशवबुवा ठाकूर
(१३) कोचरेकर रघुनाथबुवा रामदास

(१४) द्वादशीकरबुवा बांबर्डेकर
(१५) सितारामबुवा
(१६) शुकदेव
(१७) **भगवानगिरी**
(१८) **श्री दत्तगिरी**
(१९) श्री काननाथ
(२०) **श्री आनंदनाथ**
(२१) बाबा महाराज
(२२) गोविंददादा
(२३) उमाजीबुवा
(२४) परमहंस पद्मनाथ तीर्थ ( बाड )
(२५) संतीणबाई
(२६) मुकुंदबुवा
(२७) वायंगणकर जनार्दनबुवा
(२८) भालचंद्र महाराज
(२९) चिमाबाई संतीण कुंभवडकर

**स्वामी चिदानंदांची समाधी बागलांच्या राईंत आहे.**

**कोकणचे ऐतिहासिक संदर्भ**

—वाकाटक वंशाचा मूळ पुरुष विन्ध्यशक्ति हा ब्राह्मण जातीय होता. कारण अजंठ्याच्या लेण्यांत त्याचे वर्णन द्विज असे करण्यात आले आहे. **सातवाहनांप्रमाणे वाकाटक** हेही **ब्राह्मणच** हें आतां सर्व मान्य झाले आहे. प्राचीन काळीं भारतांत जीं अत्यंत बलाढ्य साम्राज्यें अस्तित्वात आलीं त्यांत **वाकाटक** साम्राज्याचा अंतर्भाव होता इ. स. २५० ते ५५० पर्यंत वाकाटकांनी विदर्भावर राज्य केलें त्यांची सत्ता **नर्मदेपासून** तुंगभद्रेपर्यंत व अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत पसरली.

—सातवाहनाच्या अस्तानंतर सन २५० सुमारास उत्तर महाराष्ट्र गुजराथ व कोकण या प्रदेशांवर जशी अभिरांची सत्ता होती तशी विदर्भावर वाकाटकांची सत्ता पसरली असावी.

—४५० वर्षांच्या दीर्घ कालांत सत्ता गाजविणाऱ्या **सातवाहन** वंशाचा सन २५० च्या सुमारास अस्त झाला. सात वाहनांचे राज्य नष्ट झाल्यावर त्याचे सेवक, **आभीर, आन्ध्र, गर्दभील, शकयवन, तुषार, मुरुण्ड, हूण** हे उदयास आले असें पुराणे सांगतात. आभीर राजांनी उत्तर महाराष्ट्र, कोंकण, गुजराथ यांवर सत्ता प्रस्थापिक केली. हैदराबादच्या दक्षिण भागांत शक उदयास आले. राज्य शासन **सामन्त** ( प्रांताधिपति ) **नायक** ( विभाग प्रमूख ) आणि **ठाकूर** जिल्हाप्रमूख अशीं शासकांची नावें आली आहेत. सामान्यतः सेनाधिकाऱ्यांची प्रांताधिपती म्हणून नियुक्ती करण्यात येई. **पाटील** या संज्ञेचा **ग्रामपति** म्हणून उल्लेख आला आहे.

—कोकणच्या पश्चिम किनाऱ्यावर शुर्पारक, ठाणा, कल्याण, चोल, देवगड, खारेपाटण, विजयदुर्ग, मालवण, गोवा इत्यादि बंदरांतून मोठा व्यापार प्राचीन कालापासून चालत आला आहे. मुसलमानी प्रवाशांच्या वृत्तांतावरून या बंदरांतून कापूस, मलमलीची वस्त्रें, चामडीं, नारळ, सुपाऱ्या, नीळ, वगैरे वस्तु पाठविल्या जात व सोने, चांदी, तांबें, कथील शिसे इत्यादि पदार्थ येथें आणित. अरबी घोड्यांना येथें फार मागणी होती.

—उत्तर व दक्षिण कोकणचे शिलाहार निष्ठावान शिवभक्त होते. काहीं देवींच्या देवालयांचे उल्लेख शिलाहारांच्या ताम्रपटांत येतात त्यांत कोल्हापूरची महालक्ष्मी प्रसिद्ध

आहे. तिच्या उजवीकडे महाकाली आणि डावीकडे महासरस्वति यांच्या देवकुळी आहेत. हें शक्तिपीठ असून कोल्हापूरचे शिलाहार तिचे निस्सीम भक्त होते. उत्तर कोकणातील संजान येथील भगवति देवीहि सुप्रसिद्ध होती. कोकणात बहुतेक ग्रामांतून भगवतीची देवालयें आढळतात.

शिलाहारांनी आपल्या राज्यांत अनेक क्षात्रवृत्तीच्या ब्राह्मणांना उच्च पदांवर नेमले होतें. त्यांत सामन्त, प्रभु, ठाकूर, नायक या नावाचे लोक आढळतात. ( अनंत देवाचा खारेपाटण ताम्रपट सं. १०१६ ) वेंगुर्ले गांवांचाहि उल्लेख आहे.

शिलाहारांच्या काळीं पश्चिम समुद्रतिरी अरबांच्या कांहीं वसाहती होत्या. राष्ट्रकूट सम्राटांचे अरबांसंबंधी सलोख्याचे धोरण होतें. राष्ट्रकूटांच्या पतनानंतर शिलाहार अपराजिताने संयान मंडळ खालसा केलें.

कोंकण चक्रवर्ती द्वितीय केशिदेवाचा चौथरपाडा शिलालेख शके ११६१ यांत माहामात्य झंपड प्रभु, महासांधिविग्रह राजदेव पंडित व खजीनदार अनंत प्रभु नावें आलीं आहेत.

द्वितीय भोजाच्या **कशेळी दानपत्रांत** (संवत १११३) १२ व्या श्लोकांत गोव्याचा **गोवायां** असा उल्लेख आला आहे.

द्वितीय केशिदेवाचा मांडवी शिलालेख संवत ११२५ शिरोभागीं कलशाची आकृती कोरली आहे. नागरी लिपी व भाषा मराठी आहे. लेखाचा उद्देश शिलाहार नृपतीचा महामात्य लक्ष्मीधर याने प्रतिष्ठापना केलेल्या लक्ष्मीनारायण देवाला फळबाग दिली हे नमूद करण्याचा होता. ते दान सोम ठाकूर याने दिले.

प्रथम अपरा दित्याच्या चांजे शिलालेखांत (सं. १०६०) महाप्रधान लक्ष्मण प्रभूचा उल्लेख आला आहे.

अनंत देवाच्या खारेपाटण ताम्रपटांत (सं. १०१६ 'गोमायं' असा गोम सामंताचा उल्लेख आहे.

मुम्मुणि राजाच्या शके सं. ९७१ ताम्रपटांत महामात्याने स्थापन केलेल्या ब्रह्मपुरी नामक अग्रहारांतील एक गांव दिल्याचा उल्लेख आहे त्यांत ब्राह्मणांचा निर्देश गौडदेश मुंजस्थान, मध्यदेश, लाट देशांतील भृगुकच्छ इ॥ ठिकाणातून ते आले होते.

शक ७६५ महाराजाधिराज परमेश्वर, पृथ्वीवल्लभ श्रीमान् राष्ट्रकूट सम्राट प्रथम अमोघ वर्ष याच्या कृपेने ज्याला सर्व कोकणदेश मिळाला त्या पुल्लशक्तीच्या काळचा कान्हेरी लेण्यातील लेख. प्रथम कपर्दीचा उल्लेख महासामंत म्हणून केला आहे.

राष्ट्रकूट सम्राट तृतीय गोविंद याच्या पायाचे चिंतन करणाऱ्या प्रथम अमोघवर्ष याच्या काळचा हा लेख. तो समग्र कोंकणचा अधिपति म्हणून राज्य करीत होता. संवत ७७५ ता. १५ सप्टें. ८५१ परमेश्वर श्रीमद् अमोघवर्ष देव प्रवर्द्धमान विजयराज्ये तत्प्रसाद-

कृतः अशेष कोंकण वल्लभः श्रीपुल्लशक्तिः समाधिगत पंचमहाशब्द महासामन्त शेखरः श्रीकपर्द्दिराज्ञः

द्वितीय कपर्दीचा शक संवत ७९९ यांत कोंकणचा अधिपति आणि महासामन्तामध्ये श्रेष्ट अशा ( शिलाहार ) कपर्दीच्या शासनचा उल्लेख आहे.

हरिपालदेवाचा आगाशी जिल्हा ठाणे हा शिलालेख ( शक संवत १०७२ ) हा उत्तर कोंकणचा शिलाहार नृपति होता. यांत महाप्रधान लक्ष्मणप्रभु प्रधान वासुगी नायक यांचा निर्देश आहे.

द्वितिय अनंत देवाचा वसई शिलालेख ( शक संवत ११२० )– हा लेख महाराजाधिराज कोंकण चक्रवर्ती **अनंत देव** यांचा आहे. तो शिलाहार होता. यांत लाहुगी प्रभुसुत सामंत असा उल्लेख आहे. महामात्य नाईक ब्रीहीम प्रभु, श्रीवाहिम प्रभू असे उल्लेख आहेत.

रट्टराजाचा खारे पाटण ( शिलहार ) ताम्रपट **शक** ९३० राष्ट्रकुटचे मांडलिक असल्यामुळें प्रथम राष्ट्रकुटांची वंशावळ आली आहे. गोव्याला पूर्वी **लंका** म्हणत. सिंहल हे गोवा द्वीपाचे प्राचीन नाव होय. **बलिपत्तन** हे **खारे पाटणचे** प्राचीन नाव.

अपरादित्याने दक्षिण कोंकणातून कदंबांना हाकून लावून सबंध कोकणप्रदेश आपल्या ताब्यांत आणला होता असे **वडवली** ताम्रपटांत म्हटले आहे ( शक संवत १०६१ ) उत्तर कोकणचा शेवटचा शिलाहार नृपति **सोमश्वर** याने महाराजाधिराज व कोकणचक्रवर्ती अशा पदव्या धारण केल्या होत्या याचे दोन शिलालेख सांपडले आहेत. एक शक संवत ११८१ व ११८२ त्याच्या कालात देवगिरीच्या यादवांची सत्ता वर्धिष्णु होती. उत्तर कोकणच्या प्रशासनाकरतां **अच्युत** नामक राज्यपालाची नेमणूक केली होती. शिलाहारांनी उत्तर कोकणवर सुमारें साडेचारशें वर्षे राज्य केले त्याच्या उत्तर कोकणमधील प्रदेशाला पुरी-प्रभुति कोकण असे नाव होते व त्यांत १४०० खेड्यांचा समावेश होता.

बारामतीचा चालुक्यनृपति मंगलेश यांच्या कारकीर्दींत चालुक्यांनी दक्षिणकोकण जिंकून घेतलें होतें. नेरूर ताम्रपटात म्हटले आहे की मंगलेशाने १८ युद्धांत विजयी झालेल्या चालुक्यवंशी स्वामी राजाला ठार केलें. त्याची राजधानी **रेवतीद्विप** ( रेडी ) येथें होती. नंतर मंगलेशाने आपला नातलग बटपुरा वंशातील सत्याश्रय ध्रुवराज इंद्रवर्मा याला दक्षीण कोकणचा अधिपति केलें. गोवा ताम्रपटावरून तो शक संवत ६१० मध्ये **रेवतीद्विप** येथें चार प्रांतावर राज्य करीत होता असे म्हटले आहे.

## संदर्भ :

डॉ. मिराशी : वाकाटकांचा इतिहास, डॉ. मिराशी : शिलाहारांचा इतिहास, वासुदेवराव बांबर्डेकर : मठगांवचा इतिहास, गुं. फ. आजगांवकर : कुडाळदेशकर भाग १ ते ३ विजयनगर साम्राज्याचा इतिहास, श्री. नाईक : दाभोली मठाचा इतिहास, डॉ. मिराशी : सातवहान राजवंश, पिंगुळकर कृत सावंतवाडी संस्थानचा इतिहास, पोर्तुगीज इतिहासाचीं साधनें, र. गो. सरदेसाई कृत मराठी रियासत.

# : आमची प्रकाशने :

१) वा. रा. ढवळे व्यक्ती आणि कार्य—संपादक : गुं. फ. आजगांवकर पृष्ठे १४० किं. ३० रु.
२) नटवर्य माधवराव वालावलकर : किं. २५ रु. पृष्ठे १६०
३) क्रांतीपराग : (काव्यसंग्रह) प्रस्तावना सदानंद रेगे किं. १० रु.
४) प्राचीन मराठी संतकवी : भाग २, ३ महाराष्ट्र भाषा भूषण ज. र. आजगांवकर पृष्ठे १००० किं. ६०
५) भारतातील शास्त्रांचा उद्‌गम व विकास : पृष्ठे ३२०
६) सेनापती भोसले : किं. १० रु. गुं. फ. आजगांवकर
७) आजगांव दर्शन : किं. १० रु. गुं. फ. आजगांवकर
८) वालावल दर्शन : किं. १० रु. गुं. फ. आजगांवकर
९) संरक्षण शास्त्र आणि तंत्र : कॅ. मा. कृ. शिंदे ३० रु.
१०) कुडाळ देशकर : खंड १ ते ३ किं. ५० रु.
११) जीवन ह्याला नाव : किं. १० रु.
१२) प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी : किं. २० रु.
१३) नटवर्य परशुराम सामंत : किं. ३० रु.
१४) स्वरभूषण वसंत देसाई : गुं. फ. आजगांवकर किं. २ रु.
१५) माझी वाटचाल (आत्मचरित्र) : डॉ. नाईक १५ रु.
१६) गुं. फ. आजगांवकर (चरित्र) : किं. १० रु.
१७) स्वानंद लहरी : ले. स्वामी चिदानंद संपादन—गुं. फ. आजगांवकर
१८) अनंत शिवाजी देसाई टोपीवाले : किं. १० रु.
१९) माऊली माझी—कृपेची साऊली : ले. गुं. फ. आजगांवकर किं. १० रु.
२०) सोऽहम् ध्यान तरंग : ले. सद्‌गुरु प्रभु किं. २ रु.
२१) ओवी नामामृत सार : (रामनाम महात्म्य) सद्‌गुरु प्रभु किं. २ रु.
२२) 'भाव माझ्या अंतरीचे' (कविता संग्रह) : सद्‌गुरु प्रभु किं. ५ रु.
२३) 'आत्मसंवाद' : सद्‌गुरु प्रभु किं. २ रु.
२४) श्री देव वेतोबा स्तवन मुक्तावली : सद्‌गुरु प्रभु किं. २ रु.
२५) दत्तावतार वासुदेवानन्द सरस्वती : (एकध्यायी ओवी चरित्र) किं. २ रु.
२६) श्रीदेवी सातरी स्तोत्र : किं. २ रु.
२७) आनंदीयात्री : ले. म. भा. माईणकर किं. ३० रु.
२८) नारायण स्तवराज : किं. ५ रु. गुं. फ. आजगांवकर
२९) तबलापटु जी. एल. सामंत : (चरित्र) गुं. फ. आजगांवकर

पत्ता : गुं. फ. आजगांवकर, १७ के. जी. बी. निवास
मॅजेस्टीक समोर, गिरगांव, मुं. ४. * फोन : २९४२९२



सामंत कुलाचा प्राचीन शिक्का




दाभोली मठसंस्थानचा शिक्का

११-२-१९८९. ) ( किंमत ५ रुपये

प्रकाशक : **श्री. गुं. फ. आजगांवकर**, १७, के. जी. बी. निवास, मुंबई ४०० ००४.
मुद्रक : **वैभव प्रिंटींग प्रेस**, २७३, व्ही. पी रोड, मुंबई ४०० ००४.